महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८

# महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१

(दिनांक १९ जानेवारी, २०११ पर्यंत सुधारित)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

**२०११**

[**किंमत :** रुपये २०.००]

# महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१

## अनुक्रमणिका

**प्रास्ताविक** **पृष्ठे**

**कलमे**

प्रकरण-एक

**प्रारंभिक**


| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | २ |
| २. | व्याख्या. | २ |
| ३. | सक्षम प्राधिकरणाची नियुक्ती. | ५ |


प्रकरण एक-अ

**झोपडपट्टी पुनर्वसन योजना**


| | | |
|---|---|---|
| ३-अ. | झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण. | ६ |
| ३-ब. | झोपडपट्टी पुनर्वसन योजना. | ६ |
| ३-क. | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे. | ७ |
| ३-ड. | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राला या अधिनियमाची इतर प्रकरणे फेरफारांसह लागू होणे. | ८ |
| ३-ई. | गाळ्यांचे हस्तांतरण करण्यावर निर्बंध. | १२ |
| ३-फ. | सदस्यत्व निरर्ह करणे व सदस्यांना काढून टाकणे. | १२ |
| ३-ग. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांच्या बैठकी. | १३ |
| ३-ह. | पद रिक्त असणे, अनौपचारिकता असणे, इत्यादींमुळे कृती विधिग्राह्य न ठरणे. | १४ |
| ३-आय. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी. | १४ |
| ३-ज. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे आदेश इत्यादींचे अधिप्रमाणन. | १४ |
| ३-के. | निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | १४ |
| ३-ल. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मत्ता, इत्यादींचा विनियोग. | १५ |
| ३-म. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा निधी. | १५ |
| ३-न. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला अनुदान, कर्जे आणि आगाऊ रकमा देणे. | १५ |
| ३-ओ. | वित्तीय निवेदन आणि कार्ययोजन. | १६ |
| ३-प. | लेखे व लेखापरीक्षा. | १६ |
| ३-क्यू. | करारांचे निष्पादन इत्यादी. | १६ |

पृष्ठे

३-र. कर्तव्यपालनात कसूर. १६

३-स. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधिकारांचे प्रत्यायोजन. १७

३-ट,त. सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृत्यांना रक्षण. १७

३-यु. अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, सदस्य व अधिकारी, इत्यादी लोकसेवक असणे. १७

३-व्ही. विनियम करण्याचा अधिकार. १७

३-डब्ल्यू. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विसर्जित करणे. १७

प्रकरण एक-ब

**संरक्षित भोगवटादार, त्याचे पुनर्स्थान निश्चयन आणि पुनर्वसन**

३-क्ष. व्याख्या. १८

३-य. फोटोपास देणे व नोंदवही ठेवणे. १८

३-झ. संरक्षित भोगवटादारांचे संरक्षण, पुनर्स्थान निश्चयन आणि पुनर्वसन. १८

३-झ-१. अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकामे पाडण्याचे सक्षम प्राधिकरणाचे अधिकार. १९

३-झ-२. अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकामे पाडून टाकणे व दंडाबाबतचे दायित्व. २०

प्रकरण एक-क

**झोपडपट्टी क्षेत्रांतील संरक्षित भोगवटादारांसाठी असलेल्या, पूर्वस्थितीत पुनर्वसन करणाऱ्या गृहनिर्माण योजनांसाठी विशेष तरतुदी**

३-झ-३. व्याख्या. २२

३-झ-४. गृहनिर्माण समिती घटित करणे. २२

३-झ-५. विकासाची परवानगी. २२

३-झ-६. या प्रकरणाच्या तरतुदी विवक्षित क्षेत्रांत लागू न होणे. २३

३-झ-७. राज्य शासनाचे नियंत्रण. २३

प्रकरण-दोन

**झोपडपट्ट्या**

४. झोपडपट्ट्यांची क्षेत्रे घोषित करणे. २४

४-अ. विवक्षित झोपडपट्टी सुधार क्षेत्रे—झोपडपट्टी क्षेत्रे असल्याचे मानणे. २५

प्रकरण तीन

**झोपडपट्ट्यांची सुधारणा**

५. सुधार कामे पार पाडण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार. २६

५-अ. सुधार कामे. २६

५-ब. भोगवटादारांना जागा रिकाम्या करावयास भाग पाडण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार. २७

| | | पृष्ठे |
|---|---|---|
| ५-क. | मानवी वस्तीस अयोग्य असणाऱ्या इमारतींची व आरोग्य इत्यादीस धोका निर्माण होण्याचे कारण होणाऱ्या क्षेत्रांची सुधारणा करण्यास भाग पाडण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार. | २७ |
| ६. | सुधारविषयक बांधकामे करण्यास भाग पाडणाऱ्या नोटिशीची बजावणी. | २८ |
| ७. | सुधारविषयक बांधकामाच्या परिरक्षणाचा खर्च भोगवटादाराकडून वसूल करावयाचा. | २८ |
| ८. | झोपडपट्टी क्षेत्रातील इमारती, इत्यादींवरील निर्बंध. | २९ |
| ९. | मानवी वस्तीसाठी अयोग्य असलेल्या इमारती पाडण्याचा आदेश देण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार. | २९ |
| १०. | इमारत पाडण्याचा आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती. | ३० |
| १०-अ. | सुधार कामे व इतर कामे सोपवण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार. | ३० |

प्रकरण-चार

**झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्विकास**

| | | |
|---|---|---|
| ११. | कोणतेही झोपडपट्टीचे क्षेत्र निर्मूलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा अधिकार. | ३१ |
| १२. | निर्मूलन आदेश. | ३१ |
| १३. | निर्मूलन क्षेत्राचा पुनर्विकास करण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार. | ३३ |

प्रकरण-पाच

**भूमि संपादन**

| | | |
|---|---|---|
| १४. | भूमि संपादन करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | ३४ |
| १५. | जमिनीचा कब्जा असलेल्या व्यक्तीला तिचा कब्जा जिल्हाधिकाऱ्याकडे परत करणे किंवा देणे इत्यादी याबाबत फर्माविण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. | ३४ |
| १६. | भरपाई मिळण्याचा हक्क. | ३५ |
| १७. | भरपाई ठरविण्यासाठी मूलतत्त्वे. | ३५ |
| १८. | भरपाईचे संविभाजन. | ३६ |
| १९. | भरपाई देणे किंवा ती न्यायालयात जमा करणे. | ३६ |
| २०. | भरपाईची रक्कम इत्यादी ठरविण्याचे सक्षम प्राधिकरणाचे अधिकार. | ३६ |
| २१. | व्याज देणे. | ३७ |

प्रकरण-सहा

**झोपडपट्टीतील भोगवटादारांचे निष्कासनापासून व अटकावणी अधिपत्रापासून संरक्षण**

| | | |
|---|---|---|
| २२. | सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय भोगवटादारांच्या निष्कासनासाठी किंवा अटकावणी अधिपत्र काढण्यासाठी कार्यवाही न करणे. | ३८ |
| २३. | अपील. | ४० |
| २३-अ. | दंडनीय धाकदपटशा दाखवून भाडे इत्यादीची वसुली करण्यास मनाई. | ४० |
| २४. | भाडेकरूस त्याने रिकाम्या केलेल्या विहित जागांचा कब्जा परत मिळणे. | ४१ |

पृष्ठे

२५. झोपडपट्टीतील इमारतींचे भाडे. ४२

२६. विवक्षित इमारतींमधून भाडेकरूंना निष्कासित करण्यास हे प्रकरण लागू नसणे. ४३

प्रकरण सात

**संकीर्ण**

२७. प्रवेश करण्याचे अधिकार. ४४

२८. तपासणी करण्याचे अधिकार. ४४

२९. बांधकाम चालू असलेल्या जमिनीशी संलग्न असलेल्या जमिनीवर प्रवेश करण्याचे अधिकार. ४४

३०. इमारतीत शिरकाव करणे. ४५

३१. दिवसा प्रवेश करणे. ४५

३२. सामान्यतः भोगवटादारांची किंवा मालकाची संमती घेणे. ४५

३३. निष्कासित करण्याच्या अधिकाराचा वापर केवळ सक्षम प्राधिकरणाने करणे. ४५

३४. झोपडपट्टी क्षेत्रामधून उपद्रवकारक किंवा घातक व्यवसाय काढून टाकण्याचे अधिकार. ४५

३५. अपिले. ४६

३६. नोटीस बजावणे, इत्यादी. ४६

३७. शास्ती. ४६

३८. विवक्षित बाबतीत इमारती पाडून टाकण्याबाबत आदेश. ४७

३९. न्यायालयांची अधिकारिता. ४८

४०. खटला भरण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची पूर्वमंजुरी. ४८

४१. सद्‌भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण. ४८

४२. अधिकारितेस रोध. ४८

४३. सक्षम प्राधिकारी इत्यादी लोकसेवक असणे. ४८

४४. सक्षम प्राधिकरणाच्या हक्क मागण्या जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यापूर्वी न्यायाधिकरणाने त्यांचा निर्णय करणे. ४९

४४-अ. न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांची रिक्त पदे व त्यांची तात्पुरती अनुपस्थिती. ४९

४५. न्यायाधिकरणासंबंधातील तरतुदी. ४९

४६. नियम करण्याचा अधिकार. ५०

४७. अनुरूप कायदे व त्या अन्वये तात्पुरते प्रदान करण्यात आलेले अधिकार अंमलात असणे बंद होणे. ५१

४८. [वगळण्यात आले]. ५१

पहिली अनुसूची. ५२

दुसरी अनुसूची [वगळण्यात आली.] ५२

## सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८[१]

# [महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१.]

[या अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती ३ ऑगस्ट १९७१ रोजी मिळाली; यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात,** भाग चार मध्ये, दिनांक ११ ऑगस्ट १९७१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आला.]

या अधिनियमात पुढील अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आल्या:—

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ (२६ एप्रिल १९७३)*
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ (२४ सप्टेंबर १९७३)*
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ (१८ सप्टेंबर १९७५)*
सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० (४ मे १९७६)*
सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ † £
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ (१८ ऑगस्ट १९८१)*
सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ (२९ सप्टेंबर १९८४)*
सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० (२३ जुलै १९८६)*
सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ (५ फेब्रुवारी १९८७)*
सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ (७ ऑगस्ट १९८७)*
सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ (२४ ऑक्टोबर १९९५)#
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (२४ ऑक्टोबर १९९५)*§§
सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० (१८ मे २००१)*@
सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ (२३ ऑक्टोबर २००३)*@@
सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ (१९ मे २००५)*

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९७०, भाग पाच, असाधारण, पृष्ठ २५२-५३, पहा संयुक्त समितीच्या अहवालासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९७१, भाग पाच, असाधारण पृष्ठ ४२९ पहा.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

† सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या अनुक्रमे कलम ७ व ८ द्वारे सन १९७८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक चार आणि पाच निरसित करण्यात आला.

£ हा अधिनियम, याची कलमे ४ आणि ८ खेरीजकरून ६ मे १९७८ रोजी अंमलात आला, ही कलमे १९ मे १९७८ रोजी अंमलात आली.

# सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ४ द्वारे सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक चौदा निरसित करण्यात आला.

§§ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याचे कलम ७ खालीलप्रमाणे वाचा :—

१९९६ चा महा. ४ "**७.** मुख्य अधिनियमाच्या महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम, १९९५ याद्वारे सुधारणा करण्यात आल्यानंतर त्याच्या तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही या अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाअन्वये, यथास्थिती, करण्यात आली असल्याचे किंवा काढण्यात आला असल्याचे मानण्यात येईल." **व्यावृत्ती.**

@ सन २००२ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ५ द्वारे सन २००२ चा अध्यादेश क्रमांक सत्तावीस निरसित करण्यात आला.

@ @ सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ द्वारे सन २००३ चा अध्यादेश क्रमांक दहा निरसित करण्यात आला.

**राज्यातील झोपडपट्ट्यांची सुधारणा व निर्मूलन करणे यासाठी व त्यांच्या पुनर्विकासासाठी [१][आणि भोगवटादारांना निष्कासित होण्यापासून आणि अटकावणी अधिपत्रापासून संरक्षण देण्यासाठी] अधिक चांगल्या तरतुदी करण्यासाठी अधिनियम**.

**ज्याअर्थी,** राज्यातील झोपडपट्ट्यांची सुधारणा व निर्मूलन करणे यासाठी व [२][त्यांच्या पुनर्विकासासाठी आणि भोगवटादारांना निष्कासित होण्यापासून आणि अटकावणी अधिपत्रापासून संरक्षण देण्यासाठी] व पूर्वोक्त प्रयोजनांशी संबंधित बाबींकरिता अधिक चांगली तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बावीसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे.

प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.** **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा क्षेत्रात[३] व अशा दिनांकास[३] अंमलात येईल, आणि भिन्न क्षेत्रांसाठी भिन्न दिनांक नेमता येतील.

**व्याख्या.** **२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) " प्रशासक " म्हणजे,

(एक) बृहन्मुंबईत किंवा तिच्या कोणत्याही भागात, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशी, विभागीय आयुक्ताच्या दर्जाहून कमी दर्जाची नसणारी व्यक्ती, आणि

(दोन) अन्यत्र, विभागीय आयुक्त ;

(ब) " इमारत " या संज्ञेत, घर, उपगृह, तबेला, छपरी, झोपडी व इतर परिवेष्टित जागा किंवा बांधकाम यांचा अंतर्भाव होईल—मग ते दगडविटा, विटा, लाकूड, चिखल, धातू किंवा इतर कशाही प्रकारच्या वस्तूंचे असो व ते माणसाचे निवासस्थान म्हणून किंवा अन्य प्रकारे वापरण्यात येत असो, आणि तीत, व्हरांडा, स्थायी चबुतरे, जोती, दरवाजाच्या पायऱ्या, विजेचे मीटर्स, आवाराच्या भिंतीसह भिंती व कुंपण आणि यांसारख्या बाबींचाही अंतर्भाव होईल, परंतु तीत, इमारतीत समाविष्ट असलेल्या संयंत्राचा किंवा यंत्रसामग्रीचा अंतर्भाव होणार नाही ;

[४][(बअ) " मुख्य कार्यकारी अधिकारी " म्हणजे, कलम ३अ च्या पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी;]

---

[१] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये " आणि त्यांच्या पुनर्विकासाकरिता " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] बृहन्मंबई महानगरपालिका आणि पुणे व सोलापूर शहर महानगरपालिका आणि नागपूर शहर महानगरपालिका आणि औरंगाबाद नगरपालिका यांच्या हद्दीतील क्षेत्रात ३ सप्टेंबर १९७१ (पहा शासकीय अधिसूचना, नगरविकास, आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग, क्रमांक एससीए. १५७१/३५३२५-एफ/तीन, दिनांक ३ सप्टेंबर १९७१).

[४] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २ द्वारे खंड बअ) समाविष्ट करण्यात आला.

[१][(ब-१) " जिल्हाधिकारी " म्हणजे, जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, असा आहे आणि त्यात अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा या अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याची कामे पार पाडण्यासाठी राज्य शासनाने विशेषरीत्या नियुक्त केलेला कोणताही अधिकार यांचा समावेश होतो ;]

(क) " सक्षम प्राधिकरण " म्हणजे, कलम ३ अन्वये सक्षम प्राधिकारी किंवा प्राधिकरण म्हणून नेमलेली व्यक्ती किंवा संस्था ;

(ड) " जमीन " या संज्ञेत, इमारती व जमिनीपासून मिळणारे लाभ आणि भूमीशी संलग्न असलेल्या वस्तू किंवा भूमीशी संलग्न असलेल्या कोणत्याही वस्तूला कायम जखडलेल्या वस्तू यांचा अंतर्भाव होईल ;

(ई) " भोगवटादार " या संज्ञेत पुढील व्यक्तींचा अंतर्भाव होईल :—

(एक) ज्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात भाडे दिले जात असेल किंवा देय असेल, अशा जमिनीचे किंवा इमारतीचे भाडे किंवा भाड्याचा कोणताही भाग, जी व्यक्ती त्या त्या वेळी मालकाला देत असेल किंवा देण्यास पात्र असेल, अशी कोणतीही व्यक्ती ;

(दोन) आपल्या जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा किंवा अन्य प्रकारे वापर करीत असलेला मालक ;

(तीन) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा भाडेमाफ भाडेकरू ;

(चार) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा करीत असलेला लायसनधारक ; आणि

(पाच) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा वापर व भोगवटा केल्याबद्दल मालकास नुकसानभरपाईची रक्कम देण्यास पात्र असणारी कोणतीही व्यक्ती ;

(फ) " मालक " ही संज्ञा कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या संदर्भात वापरण्यात आली असता तिचा अर्थ, जर इमारत किंवा जमीन भाड्याने देण्यात आली तर, इमारतीचे किंवा जमिनीचे भाडे जी व्यक्ती घेईल किंवा ज्या व्यक्तीस भाडे घेण्याचा हक्क असेल अशी व्यक्ती असा असून तीत पुढील व्यक्तींचा अंतर्भाव होईल :—

(एक) मालकासाठी म्हणून जो असे भाडे घेत असेल तो एजंट किंवा विश्वस्त ;

(दोन) धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनार्थ असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भाडे ज्यास मिळत असेल, किंवा ज्याच्याकडे अशी इमारत किंवा जमीन सोपविण्यात आली असेल किंवा जो अशा इमारतीशी किंवा जमिनीशी संबंधित असेल, असा एजंट किंवा विश्वस्त ;

(तीन) उक्त इमारतीचा किंवा जमिनीचा प्रभार घेण्यासाठी किंवा तिच्या मालकीहक्कांचा वापर करण्यासाठी म्हणून, सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाने नेमलेला धारक (रिसिव्हर) पृथःकर्ता (सिक्वेस्ट्रेटर) किंवा व्यवस्थापक ; आणि

(चार) ताबेगहाणदार,

[२][परंतु, " झोपडपट्टी दादा " या शब्दप्रयोगाचा त्यात अंतर्भाव होणार नाही ;]

(ग) " विहित " म्हणजे या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले ;

---

[१] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २(अ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१][(गअ) " झोपडपट्टी क्षेत्र " म्हणजे, कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकरणाने असे क्षेत्र म्हणून घोषित केलेले कोणतेही क्षेत्र ;]

(ह) " झोपडपट्टी निर्मूलन " म्हणजे, कोणत्याही झोपडपट्टीचे, तीमधील इमारत पाडून किंवा ती काढून टाकून निर्मूलन करणे ;

[२][(हअ) " झोपडपट्टी दादा " म्हणजे, जी व्यक्ती, बेकायदेशीरपणे कोणत्याही जमिनींचा (मग त्या जमिनी शासनाच्या मालकीच्या असोत किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या असोत किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या मालकीच्या असोत) ताबा घेते किंवा अशा जमिनीवर प्रवेश करते किंवा बेकायदेशीरपणे त्या जमिनीच्या संबंधात भाडेदारीचा अथवा संमती नि परवानगी (लिव्ह अँड लायसेन्स) करार व अन्य कोणतेही करार करते, किंवा जी व्यक्ती, विकण्याच्या वा भाड्याने देण्याच्या उद्देशाने त्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम करते किंवा अशा जमिनी कोणत्याही व्यक्तीला भाड्याने अथवा संमती नि परवानगी (लिव्ह अँड लायसेन्स) तत्त्वावर बांधकामासाठी किंवा त्यावरील अनधिकृत बांधकामाचा वापर वा भोगवटा करण्यासाठी देते, किंवा जी व्यक्ती, अशा जमिनींचा बेकायदेशीर ताबा घेण्याकरिता किंवा ज्या जमिनींवर अनधिकृत बांधकाम करण्याकरिता दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला जाणीवपूर्वक पैशाची मदत देते, किंवा जी व्यक्ती अशा जमिनींवर राहणाऱ्या रहिवाशांकडून भाडे, भरपाई किंवा इतर आकार धाकदपटशाने वसूल करते वा वसूल करण्याचा प्रयत्न करते, किंवा जी व्यक्ती, कोणत्याही कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता तेथील भोगवटादारांना बळजबरीने हुसकावून लावते वा तसा प्रयत्न करते किंवा जी व्यक्ती, वर नमूद केलेल्यांपैकी कोणतीही गोष्ट करण्यास अन्य कोणत्याही मार्गाने प्रोत्साहन देते, ती व्यक्ती होय ;]

[३][(हब) " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र " म्हणजे, कलम ३ब अन्वये अधिसूचित केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अनुरोधाने सक्षम प्राधिकरणाकडून कलम ३अ च्या पोट-कलम (१) अन्वये असे क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र ;

(हक) " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण " म्हणजे, राज्य शासनाने कलम ३अ अन्वये नियुक्त केलेले किंवा केलेली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण किंवा प्राधिकरणे ;

(हड) " झोपडपट्टी पुनर्वसन योजना " म्हणजे, कलम ३ब अन्वये अधिसूचित केलेली झोपडपट्टी पुनर्वसन योजना ; " ;].

[४][(आय) " [५][न्यायाधिकरण किंवा विशेष न्यायाधिकरण]" म्हणजे, याद्वारे ज्याची रचना करण्याचा अधिकार राज्य शासनास प्रदान करण्यात आला आहे असे [५][न्यायाधिकरण किंवा विशेष न्यायाधिकरण], व त्यात,—

(अ) अध्यक्ष,—

(एक) जो जिल्हा न्यायाधीश म्हणून काम करीत असेल किंवा तसे काम केलेले असेल किंवा ज्याने आठ वर्षांहून कमी नाही इतका काळ वकील किंवा अधिवक्ता किंवा दोन्ही म्हणून काम केलेले असेल किंवा जो विधि व न्याय विभागात सहसचिवाच्या दर्जाहून कमी

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १०२ अनुसूची दोन द्वारे खंड (गअ) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २(ब) द्वारे खंड (हअ) समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी खंड (आय) दाखल करण्यात आला.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २(ब) द्वारे " न्यायाधिकरण " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

दर्जाचे नसेल असे पद धारण करीत असेल किंवा ज्याने असे पद या पूर्वी धारण केलेले असेल ; किंवा

(दोन) जो [१][आठ वर्षांहून] कमी नसेल इतका काळ कोणतेही न्यायिक पद धारण करीत असेल किंवा ज्याने असे पद धारण केलेले असेल ; किंवा

(तीन) जो आठ वर्षांहून कमी नसेल इतका काळ, अधिवक्त्याचा व्यवसाय करीत असेल किंवा ज्याने असा व्यवसाय केलेला असेल,

अशी व्यक्ती असेल ; आणि

(ब) दोन सदस्य,—

(एक) यापैकी एक व्यक्ती ही उप संचालक, नगररचना या दर्जाहून कमी दर्जाचे नसेल असे पद धारण करीत असेल किंवा जिने असे पद यापूर्वी धारण केलेले अशी व्यक्ती असेल ; आणि

(दोन) दुसरी व्यक्ती, शासनाच्या अधीक्षक अभियंत्याच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसेल असे पद धारण करीत असेल किंवा जिने असे पद यापूर्वी धारण केलेले असेल अशी व्यक्ती असेल ;

याचा समोवेश असेल ;].

(ज) "सुधारणाविषयक बांधकामे" या संज्ञेत, झोपडपट्टीतील कोणत्याही इमारतीच्या संबंधात, पुढीलप्रमाणे कोणत्याही एका किंवा अधिक बांधकामांच्या कार्यान्वयनाचा समावेश होईल :—

(एक) आवश्यक असतील अशा दुरुस्त्या ;

(दोन) संरचनात्मक फेरफार ;

(तीन) विजेचे पॉईंटस्, पाण्याचे नळ आणि स्नानाच्या जागा यांची तरतूद ;

(चार) उघडी किंवा आच्छादित निःसारणाची बांधकामे ;

(पाच) पाट्यांच्या संडासांचे जलधौत संडासांमध्ये रुपांतर करणे यासह, शौचकूपांची तरतूद ;

(सहा) जादा किंवा सुधारित खिळण्यांची (फिक्सर्च) किंवा जोडण्यांची (फिटींग्ज) तरतूद ;

(सात) अंगण तयार करणे किंवा त्यांना फरसबंदी करणे ;

(आठ) मार्गांचे किंवा रस्त्यांचे बांधकाम ;

(नऊ) वर विनिर्दिष्ट केलेल्या कामांपैकी कोणतीही कामे पार पाडण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मते आवश्यक असेल अशी कोणतीही इमारत किंवा तिचा भाग पाडणे यासह कोणतेही इतर बांधकाम.

**सक्षम प्राधिकरणाची नियुक्ती.**

**३.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सक्षम प्राधिकरण म्हणून कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

(२) (स्थानिक प्राधिकरण धरून) कोणत्याही निगम निकायास सक्षम प्राधिकरण म्हणून नेमण्यात आले असेल त्या बाबतीत, सक्षम प्राधिकरण या बाबतीत लादील अशा निर्बंधास व शर्तीस अधीन राहून, अशा निगम निकायाच्या वतीने, [२][याबाबत त्या सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे नेमलेला संबंधित प्राधिकरणाचा अधिकारी].

या अधिनियमाखालील सक्षम प्राधिकरणांच्या अधिकारांचा वापर करील व त्यांची कामे पार पाडील.

[३][ * * * ]

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम २ (अ) द्वारे हा मजकुर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(ब) द्वारे खंड (अ), (ब), (क) व (ड) वगळण्यात आले.

[1][प्रकरण एक-अ

## झोपडपट्टी पुनर्वसन योजना

**झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.**

**३-अ.** (१) पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण म्हणून संबोधण्यात यावयाच्या प्राधिकरणाची नियुक्ती करता येईल आणि वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी वेगवेगळी प्राधिकरणे नियुक्त करता येतील.

(२) प्रत्येक झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर चौदा सदस्य यांचा समावेश असेल, आणि या सर्वांची राज्य शासनाकडून नियुक्ती करण्यात येईल.

[2][" (२अ) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेले प्रत्येक झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण " या नावाचा एक निगम निकाय असेल आणि त्याची अखंड परंपरा असेल व त्याचा एक सामाईक शिक्का असेल, त्यास करार करण्याचा, स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा व ती निकालात काढण्याचा, आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल, आणि त्याच्या निगम नावाने त्याला किंवा त्याच्यावर दावा लावता येईल ".]

[3][" (३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकार, कर्तव्ये व कामे पुढीलप्रमाणे असतील.—

(अ) झोपडपट्टी क्षेत्रासंबंधीच्या विद्यमान स्थितीचे सर्वेक्षण करणे व आढावा घेणे ;

(ब) झोपडपट्टी क्षेत्रांच्या पुनर्वसनाकरिता योजना तयार करणे ;

(क) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी करवून घेणे ;

(ड) झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर सर्व कृती व गोष्टी करणे ".]

(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीच्या अटी, शर्ती, राज्य शासन विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असतील.

(५) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास, कलम ३ब अन्वये तयार करण्यात आलेल्या योजनेचे काम सुकर करण्यासाठी आणि योजना जलद गतीने राबविण्यासाठी त्यांचे सदस्य व तज्ञ व्यक्ती यांचा समावेश असलेल्या समित्यांची नियुक्ती करता येईल.

**झोपडपट्टी पुनर्वसन योजना.**

**३-ब.** (१) कलम ३-अ च्या पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांमधील झोपडपट्टीच्या व झोपडपट्ट्यांच्या वसाहतीच्या पुनर्वसनाकरिता, राज्य शासन किंवा राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अशा क्षेत्रांसाठी एक सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार करण्यात आलेली सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना यथास्थिति, राज्य शासनाकडून किंवा संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी कलम ३-अ (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी तात्पुरती झोपडपट्टी पुनर्वसन योजना म्हणून **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल आणि उक्त योजनेसंबंधात कोणतेही आक्षेप व सूचना असल्यास त्या मागवण्यात येतील, आणि कोणतेही आक्षेप व सूचना असल्यास त्या सादर करण्यासाठी ३० दिवसांहून कमी नसेल इतकी वाजवी मुदत देण्यात येईल.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, उक्त तात्पुरत्या योजनेच्या संबंधात विनिर्दिष्ट मुदतीत कोणतेही आक्षेप व सूचना प्राप्त झालेल्या असल्यास, त्या विचारात घेईल आणि

---

[1] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३ द्वारे प्रकरण एक-अ समाविष्ट करण्यात आले.
[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३(अ) द्वारे पोट-कलम (२अ) दाखल करण्यात आले.
[3] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) द्वारे पोट-कलम (ड) दाखल करण्यात आले.

योग्य किंवा आवश्यक वाटतील असे फेरफार केल्यानंतर राज्य शासनाच्या किंवा यथास्थिति, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने उक्त योजना झोपडपट्टी पुनर्वसन योजना म्हणून **राजपत्रात** अंतिमतः प्रसिद्ध करील.

(४) पोट-कलम (३) अन्वये अशाप्रकारे अधिसूचित करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये, सामान्यतः झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून कोणतेही क्षेत्र घोषित करण्यासाठी परिमाणे ठरवून देण्यात येतील आणि झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्रांचे पुनर्वसन ज्या रीतीने करण्यात येईल ती रीत नमूद करण्यात येईल. विशेषतः त्यामध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीची तरतूद करण्यात येईल, त्या म्हणजे :—

(अ) झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून एखादे क्षेत्र घोषित करण्यासंबंधीची परिमाणे किंवा मार्गदर्शक तत्त्वे ;

(ब) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअन्वये झोपडपट्टींच्या क्षेत्रांच्या विकासाची मूलभूत व आवश्यक परिमाणे ;

(क) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्रांमधील जमीनधारक व भोगवटादार यांचा योजना राबवण्याच्या कामातील सहभाग बंधनकारक ठरविणारी तरतूद ;

(ड) झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राचा विकास करण्यात येईतोपर्यंत, व अशा क्षेत्रांच्या भोगवटादारांना विकास झाल्यावर गाळ्यांचे मोफत वाटप केले जाईपर्यंत संक्रमणकालीन निवासस्थान देण्यासंबंधातील तरतूद ;

(ई) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखालील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राचा तेथील जमीनधारकांनी व भोगवटादारांनी स्वतःच किंवा विकासकर्त्यामार्फत विकास करण्याची योजना व अशा विकासाच्या संबंधातील अटी व शर्ती ; आणि जमीनधारक किंवा भोगवटादार या योजनेत सहभागी न झाल्यास त्या बाबतीत, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास असलेला, अशा विकासाचे काम हाती घेता येण्याचा पर्याय ;

(फ) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राच्या विकासासाठी विकासकर्त्याला उपलब्ध करून द्यावयाचा तळपृष्ठ निर्देशांक व कोणतेही विकास हक्क असल्यास त्यांचे हस्तांतरण, यांना मंजुरी देण्यासंबंधातील तरतूद ;

(ग) विवक्षित मुदतीसाठी गाळे अहस्तांतरणीय असणे, इत्यादींच्या संबंधातील तरतूद.

**झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे.**

**३-क.** (१) झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिद्ध झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर [१][मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला] कोणत्याही क्षेत्रांच्या बाबतीत, ते क्षेत्र उक्त योजनेअन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची, खात्री पटल्यावर **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे असे क्षेत्र " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र " म्हणून घोषित करता येईल. झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणाऱ्या आदेशास (यात यापुढे ज्याचा निर्देश " झोपडपट्टी पुनर्वसन आदेश " असा करण्यात आला आहे.) [२][झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून] विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देखील देण्यात येईल.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन आदेशाद्वारे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश प्रसिद्ध झाल्यापासून चार आठवड्यांच्या आत विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ४(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राला या अधिनियमाची इतर प्रकरणे फेरफारांसह लागू होणे.**

**३-ड.** कलम ३-ब च्या पोट-कलम (१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिद्ध झाल्यावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या कोणत्याही क्षेत्राला, या अधिनियमाच्या इतर प्रकरणांच्या तरतुदी, पुढील फेरफारांसह अधीन राहून, लागू होतील :—

(अ) प्रकरण दोन व तीन वगळण्यात येतील ;

(ब) प्रकरण चार मध्ये,—

(एक) कलम ११ वगळण्यात येईल ;

(दोन) कलम १२ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल—

"(१) [1][मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने] कोणतेही झोपडपट्टी क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केल्यानंतर शक्य तितक्या लवकर [2][तो] त्या क्षेत्राच्या संबंधात निर्मूलन आदेश काढील व त्याद्वारे त्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या इमारतींपैकी प्रत्येक इमारत पाडून टाकण्याचा आदेश देईल आणि अशी प्रत्येक इमारत निर्मूलन आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत रिकामी करण्यास फर्मावील ";

(ब) पोट-कलम (२) व (३) वगळण्यात येतील ;

(क) पोट-कलम (४) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) निर्मूलन आदेशाद्वारे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश प्रसिद्ध झाल्यापासून चार आठवड्यांच्या आत, विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल, आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल ";

(ड) पोट-कलम (५) मध्ये " न्यायाधिकरणास " व " न्यायाधिकरणाची " हे शब्द ज्या ठिकाणी आले आहेत तेथे त्याऐवजी " विशेष न्यायाधिकरणास " व " विशेष न्यायाधिकरणाची " हे शब्द दाखल करण्यात येतील;

[3][(ई) पोट-कलम (७) मध्ये, " सक्षम प्राधिकाऱ्यास " या मजकुराऐवजी " मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(फ) पोट-कलम (८) मध्ये, " सक्षम प्राधिकाऱ्यास " या मजकुराऐवजी " मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (९) मध्ये, " सक्षम प्राधिकारी " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला आहे त्या त्या ठिकाणी त्या मजकुराऐवजी " मुख्य कार्यकारी अधिकारी " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(ह) पोट-कलम (१०) मध्ये,—

(अ) " सक्षम प्राधिकाऱ्याने " या मजकुराऐवजी " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) परंतुकामध्ये,—

(एक) " सक्षम प्राधिकाऱ्याने " या मजकुराऐवजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " न्यायाधिकरण " हा मजकूर जेथे जेथे त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला आहे तेथे त्या ऐवजी " विशेष न्यायाधिकरण " हा मजकुर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;]

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ४(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ५(अ) (एक) (ब) द्वारे हा परिच्छेद दाखल करण्यात आला.

[1][(तीन) कलम १३ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

" १३. (१) कलम १२ च्या पोट-कलम (१०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही कोणतेही क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आल्यानंतर, अशा क्षेत्राचे भूधारक किंवा भोगवटादार, वाजवी वेळात, अशा जागेच्या पुनर्विकासाची योजना घेऊन पुढे आले नाहीत तर, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणास, अशी जमीन त्या प्रयोजनासाठी कोणत्याही एजन्सीकडे सोपवून अशा जमिनीचा पुनर्विकास करण्याचे आदेशाद्वारे ठरविता येईल.

(२) कोणतेही क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आल्यावर, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील जमिनीचा तिच्या मालकाकडून यथोचितरीत्या मान्यता देण्यात आलेल्या नकाशांचे किंवा कलम १२ च्या पोट-कलम (१०) अन्वये लादण्यात आलेल्या कोणत्याही निर्बंधाचे किंवा शर्तीचे उल्लंघन करून विकास करण्यात आला आहे किंवा विकास करण्यात येत आहे किंवा अशा शर्तीअन्वये कोणतीही मुदत विनिर्दिष्ट करण्यात आली असल्यास, अशा मुदतीमध्ये विकास करण्यात आलेला नाही याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची खात्री पटली असेल तर, त्यास, ती जमीन त्या प्रयोजनार्थ कोणत्याही एजन्सीकडे सोपवून तिचा विकास करण्याचे आदेशाद्वारे ठरविता येईल :

परंतु असा आदेश काढण्यापूर्वी मालकाला असा आदेश का काढण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दाखविण्याची वाजवी संधी देण्यात येईल."];

(क) प्रकरण पाचमध्ये,—

(एक) कलम १४ मधील पोट-कलम (१) मध्ये,—

[(अ) " सक्षम प्राधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही अभिवेदनावरून " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " शक्य व्हावे म्हणून " या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" जेव्हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही अभिवेदनावरून राज्य शासनास असे दिसून येईल की, " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कोणत्याही झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली विकास करणे शक्य व्हावे म्हणून " ;]

(ब) परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल,—

" आणखी असे की, राज्य शासनास, या पोट-कलमाखालील त्याचे अधिकार आयुक्तापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवता येतील. " ;

[2][" (दोन) कलम १५ मध्ये,—

(अ) पोट-कलम (३) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी जमीन संपादन करण्यात आली असेल त्याबाबतीत, राज्य शासन, तिचा कब्जा घेतल्यानंतर, शासन आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना परस्परात मान्य असतील अशा शर्तीवर जमिनीचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे हस्तांतरण करील आणि त्यानंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कलम ३ब (४) च्या तरतुदीनुसार अशा क्षेत्राच्या विकासाचे काम कलम १३ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, कोणत्याही इतर अभिकरणाकडे किंवा अशा पुनर्वसन क्षेत्रांच्या भोगवटादारांच्या किंवा झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही पुनर्वसन क्षेत्राच्या भोगवटादारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे सोपवू शकेल. " ;

(ब) पोट-कलम (४) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला, या अधिनियमाची प्रयोजने साध्य करण्यासाठी राज्य शासनाला इष्ट वाटतील अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, अशी जमीन अशा भोगवटादारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थाकडे भाडेपट्टा करून हस्तांतरित करता येईल.";]

---

[1] वरील अधिनियमाच्या कलम ५ (अ) (दोन) द्वारे उप-खंड (तीन) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात आला.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम ५(ब) (दोन) द्वारे उप-खंड (दोन) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात आला.

[1][“ (तीन)  कलम १७ मध्ये,—

(अ)  “ सक्षम प्राधिकारी ” हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह जेथे जेथे, आलेले आहेत तेथे त्याऐवजी “ मुख्य कार्यकारी अधिकारी ” हे शब्द दाखल करण्यात येतील;

(ब)  “ न्यायाधिकरण ” हा शब्द ज्या दोन ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला आहे त्या ठिकाणी त्या शब्दाऐवजी “ विशेष न्यायाधिकरण ” हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येतील] :

[2][(चार)  कलम १८ मध्ये,—

(अ) “ सक्षम प्राधिकारी ” हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह जेथे जेथे, आलेले आहेत तेथे तेथे त्या शब्दाऐवजी “ मुख्य कार्यकारी अधिकारी ” हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येतील ;

(ब) “ न्यायाधिकरण ” हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह जेथे जेथे, आलेला आहे त्या शब्दाऐवजी “ विशेष न्यायाधिकरण ” हे शब्द त्यांच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येतील] :

[3][“ (पाच)  कलम १९ मध्ये, “ सक्षम प्राधिकारी ” हे शब्द ज्या दोन ठिकाणी येतात त्या ठिकाणी त्या शब्दाऐवजी “ मुख्य कार्यकारी अधिकारी ” हे शब्द दाखल करण्यात येतील ;

(सहा) कलम २० मध्ये, समासटीपेसह “ सक्षम प्राधिकाऱ्यास ” हे शब्द ज्या ठिकाणी येतात त्या ठिकाणी त्या शब्दांऐवजी “ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास ” हे शब्द दाखल करण्यात येतील ;

(सात) कलम २१ मध्ये, “ सक्षम प्राधिकारी ” या शब्दांऐवजी “ मुख्य कार्यकारी अधिकारी ” हे शब्द दाखल करण्यात येतील ;]

(ड)  प्रकरण सहामध्ये,—

(एक)  कलमे २२, २३, २३अ आणि २६ ही योग्य त्या फेरफारांसह झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रास लागू असतील ;

(दोन)  कलमे २४ व २५ यांच्या ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

**भोगवटादारांना गाळ्यांचे नियत वाटप करणे.**

“ २४.  (१)  झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्रातील कोणत्याही जागेच्या भोगवटादाराने अशी जागा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली पुनर्विकास करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे, या कारणास्तव रिकामी केलेली असेल किंवा त्यास त्या कारणासाठी तेथून निष्कासित करण्यात आलेले असेल त्याबाबतीत अशा भोगवटादाराला विहित करण्यात येईल अशा मुदतीत, उक्त योजनेखाली त्या क्षेत्राचा विकास झाल्यानंतर त्याच क्षेत्रात पुनर्वसन व्हावे अशी त्याची इच्छा आहे अशा अर्थाचे प्रतिज्ञापत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दाखल करता येईल.

(२)  असे प्रतिज्ञापत्र मिळाल्यावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण त्याच्या प्रतिज्ञापनाची विहित रीतीने नोंदणी करील आणि योजनेखाली त्या क्षेत्राच्या विकासाचे आणि उक्त क्षेत्रातील इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम पूर्ण झाल्यावर नोंदणीकृत भोगवटादारांना, इमारतीच्या एखाद्या ठळक जागी नोटीस चिकटवून आणि अशा

---

[1] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) (तीन) द्वारे उप-खंड (तीन) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) (चार) द्वारे उप-खंड (चार) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) (पाच) द्वारे उप-खंड (पाच), (सहा) व (सात) समाविष्ट करण्यात आले.

भोगवटादारांनी गलिच्छ वस्ती पुनर्वसन प्राधिकरणाकडे नोंदवलेला असेल त्या पत्त्यावर टपालाने नोटीस पाठवून आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून ठरविण्यात येईल अशा अन्य रीतीने अशी नोटीस देईल की, ती इमारत विनिर्दिष्ट तारखेपासून भोगवट्यासाठी तयार होण्याची शक्यता आहे किंवा तयार झालेली आहे, आणि त्यांना कोणतेही संक्रमणकालीन निवासस्थान देण्यात आलेले असल्यास त्यांनी त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत ते रिकामे करावे आणि कशाप्रकारे पुनर्बांधणी करण्यात आलेल्या इमारतींचा ताबा घ्यावा.";

(ई) प्रकरण सातमध्ये,—

[1]["(एक-अ) कलम ४१ व ४३ व्यतिरिक्त " सक्षम प्राधिकारी " हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह जेथे जेथे आलेले आहेत तेथे त्या शब्दांऐवजी " मुख्य कार्यकारी अधिकारी " हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येतील ;]

(एक) कलम २८ मध्ये, " झोपडपट्टीतील " या मजकुराऐवजी " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) कलम ३४ मध्ये, " झोपडपट्टी " व " झोपडपट्टी क्षेत्रामधून " हा मजकूर ज्या ठिकाणी आला आहे तिथे त्याऐवजी " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) कलम ३५ मध्ये, " प्रशासनाकडे " व " प्रशासकाने " हा मजकूर ज्या ठिकाणी आला आहे तेथे त्याऐवजी अनुक्रमे " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे " व " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(चार) कलम ३७ मध्ये, " निर्मूलन क्षेत्राच्या " या मजकुराऐवजी " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(पाच) कलम ३८, पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) " कलम ८ च्या तरतुदींचे किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) " निर्मूलन क्षेत्राच्या " या मजकुराऐवजी " झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(सहा) कलम ४१ मध्ये, " सक्षम प्राधिकरणाविरुद्ध " या मजकुरानंतर " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाविरुद्ध " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(सात) कलम ४२ मध्ये,—

(अ) " प्रशासकास " या शब्दाऐवजी " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) " न्यायाधिकरणास " या मजकुराऐवजी " विशेष न्यायाधिकरणास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(आठ) कलम ४३ मध्ये, " सक्षम प्राधिकारी " या मजकुरानंतर, " झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(नऊ) कलम ४४ मध्ये, " न्यायाधिकरण " हा शब्द त्यांच्या व्याकरणिक रुपभेदांसह जेथे जेथे आला असेल तेथे तेथे त्या शब्दाऐवजी विशेष न्यायाधिकरण हे शब्द त्यांच्या व्याकरणिक रुपभेदांसह दाखल करण्यात येतील ;

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ५(अ) द्वारे हा उपखंड दाखल करण्यात आला.

(दहा) कलम ४४अ मध्ये,—

(अ) पोट-कलम (२) मध्ये, " न्यायाधिकरण " हा शब्द त्यांच्या व्याकरणिक रुपभेदांसह जेथे जेथे, आला असेल तेथे तेथे त्याऐवजी " विशेष न्यायाधिकरण " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक रुपभेदांसह समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) समासटीपेत, " न्यायाधिकरणाचा " या मजकुराऐवजी " विशेष न्यायाधिकरणाचा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(अकरा) समासटीपेसह संपूर्ण ४५ मध्ये, जेथे जेथे " न्यायाधिकरण " हा शब्द त्याच्या व्याकरणिक रुपभेदांसह आला असेल तेथे तेथे, त्याऐवजी " विशेष न्यायाधिकरण " हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक रुपभेदांसह दाखल करण्यात येईल ;

(बारा) कलम ४७ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

**तत्सम कायदे समाप्त होणे.**

" ४७. कोणतेही क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र असल्याचे घोषित करण्यात आले असेल त्याबाबतीत, अशा घोषणेच्या तारखेपासून अशा झोपडपट्टी क्षेत्राच्या संबंधात, झोपडपट्टीचा विकास करण्यासाठी या प्रकरणाच्या तरतुदींशी मिळत्याजुळत्या असलेल्या, कोणत्याही नगरपालिका कायद्याच्या किंवा अन्य कायद्याच्या उक्त तारखेच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या तरतुदी, या प्रकरणात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल, त्याव्यतिरिक्त, अशा झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात अंमलात असण्याचे बंद होतील, परंतु त्या तरतुदी उक्त घोषणा अंमलात असेल तोपर्यंतच लागू होणार नाहीत. "

**गाळ्यांचे हस्तांतरण करण्यावर निर्बंध.**

**३-ई.** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली व्यक्तींना गाळ्यांचे वाटप झाल्याच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या पहिल्या १० वर्षांच्या कालावधीत ती गाळेधारक व्यक्ती वाटप झालेल्या गाळ्याचे विक्री, देणगी, अदलाबदल, भाडेपट्टा याद्वारे किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाही. उक्त १० वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर गाळेधारकाला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या परवानगीने अशा गाळ्याचे विहित पद्धतीनुसार हस्तांतरण करता येईल. "

**सदस्यत्व निरर्ह करणे व सदस्यांना काढून टाकणे.**

[१][" **३-फ.** (१) जर एखादी व्यक्ती,—

(अ) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा कर्मचारी असेल ;

(ब) विकल मनाची असून एखाद्या सक्षम न्यायालयाकडून ती तसे असल्याचे जाहीर करण्यात आले असेल ;

(क) अमुक्त नादार असेल ;

(ड) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आली असेल ;

(ई) स्वतः किंवा कोणताही भागीदार, मालक किंवा कर्मचारी यांच्यामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने केलेल्या कोणत्याही करारात किंवा कामात पैशाच्या किंवा इतर कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हिस्साधारक किंवा हितसंबंधित असेल ; किंवा

(फ) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाबरोबर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे केलेल्या कोणत्याही करारात किंवा कामात कोणत्याही प्रकारचा हिस्सा

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६ द्वारे कलमे ३फ ते ३डब्ल्यू ही दिनांक २४ ऑक्टोबर १९९५ रोजी व तेव्हापासून समाविष्ट करण्यात आली.

किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही कंपनीचा संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा इतर अधिकारी असेल ;

तर ती व्यक्ती, अशासकीय सदस्य म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास किंवा असा सदस्य म्हणून चालू राहण्यास अपात्र ठरेल :

परंतु, एखादी व्यक्ती,—

(एक) कोणतीही विक्री, खरेदी, भाडेपट्टा, विनिमय किंवा स्थावर मालमत्ता किंवा त्यासाठी केलेला कोणताही करारनामा ;

(दोन) पैसे कर्जाऊ देण्याचा कोणताही करारनामा किंवा केवळ पैसे देण्यासाठी असलेली कोणतीही प्रतिभूती ;

(तीन) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कारभारासंबंधीची कोणतीही जाहिरात ज्या कोणत्याही वृत्तपत्रात प्रसिद्ध होत असेल असे वृत्तपत्र ;

यामध्ये तिचा किंवा ती व्यक्ती ज्या कंपनीचा संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा अन्य अधिकारी आहे त्या कंपनीचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे याच कारणावरून केवळ खंड (ई) किंवा खंड (फ) अन्वये अनर्ह ठरणार नाही.

(२) राज्य शासनाच्या मते,—

(अ) ज्यास पोट-कलम (१) अन्वये अपात्र ठरविण्यात आले असेल ;

(ब) जो काम करण्यास नकार देईल ;

(क) ज्याने, त्यांचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणावर पुढे चालू राहणे जनतेच्या हिताच्या दृष्टीने हानीकारक ठरेल अशाप्रकारे सदस्य म्हणून असलेल्या आपल्या पदाचा दुरुपयोग केलेला असेल ; किंवा

(ड) अन्यथा तो सदस्य म्हणून राहण्यास अपात्र झाला असेल ;

अशा शासनाकडून नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अशासकीय सदस्याला शासन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातून काढून टाकू शकेल.

(३) पोट-कलम (२) खालील, सदस्याला काढून टाकण्यासंबंधीचा कोणताही आदेश, अशासकीय सदस्याला त्याचे स्पष्टीकरण शासनाला सादर करण्याची संधी देण्यात आल्याखेरीज काढण्यात येणार नाही आणि असा आदेश काढण्यात आलेला असेल त्याबाबतीत अशाप्रकारे काढून टाकलेल्या सदस्यांचे पद रिक्त असल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये अशाप्रकारे ज्या सदस्याला काढून टाकण्यात आलेले असेल तो सदस्य झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा सदस्य म्हणून किंवा अन्य कोणत्याही नात्याने फेरनियुक्तीस पात्र ठरणार नाही.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बैठकी.**

**३-ग.** (१) अध्यक्ष ठरवील अशा कालांतराने, अशा वेळी आणि अशा ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण बैठक भरवील आणि पोट-कलम (२) या तरतुदींना अधीन राहून, त्या बैठकीत कामकाज पार पाडताना (तिची गणपूर्ती धरून) विनियमाद्वारे घालून देण्यात येईल अशा कार्यनियमावलीचे पालन करण्यात येईल.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने किंवा त्याच्यावतीने केलेला किंवा करावयाचे प्रस्तावित केलेला कोणताही करार, कर्ज, व्यवस्था किंवा प्रस्ताव यांच्याशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित किंवा हित-संबंधित असलेला एखादा सदस्य संधी मिळताच त्वरित त्याच्या हितसंबंधाचे स्वरूप झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास विशद करील आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कोणत्याही बैठकीत, ज्यावेळी असा करार, कर्ज, व्यवस्था किंवा प्रस्ताव यावर चर्चा होईल तेव्हा, माहिती मिळविण्यासाठी इतर सदस्यांना त्याची उपस्थिती आवश्यक वाटल्याशिवाय उपस्थित राहणार नाही. परंतु, अशाप्रकारे

उपस्थित राहण्यास सांगण्यात आलेला असा कोणताही सदस्य असा कोणताही करार, कर्ज, व्यवस्था किंवा प्रस्ताव यावर मतदान करणार नाही :

परंतु, अशा कोणत्याही कराराशी, कर्जाशी, व्यवस्थेशी किंवा प्रस्तावाशी संबंधित अशा कंपनीचा भागधारक असल्याच्या कारणावरूनच केवळ एखाद्या सदस्याचा वर निर्देश केल्याप्रमाणे संबंध वा हितसंबंध असल्याचे मानले जाणार नाही.

**पद रिक्त असणे, अनौपचारिकता असणे, इत्यादींमुळे कृती विधिअग्राह्य न ठरणे.**

**३-ह.** या अधिनियमानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या समितीने केलेले कोणतेही कृत्य किंवा केलेली कार्यवाही ही केवळ,—

(अ) कोणत्याही सदस्याचे पद रिक्त आहे किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या समितीच्या स्थापनेमध्ये किंवा पुनर्स्थापनेमध्ये कोणताही दोष आहे ; किंवा

(ब) एखाद्या व्यक्तीची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा किंवा त्याच्या समितीचा सदस्य म्हणून नियुक्ती होण्यामध्ये दोष अथवा अनियमितता आहे ; किंवा

(क) मूळ विषयावर परिणाम न करणारा असा कोणताही दोष अथवा अनियमितता अशा कोणत्याही कृतीमध्ये किंवा कार्यवाहीमध्ये आहे ;

या कारणास्तव विधिअग्राह्य ठरणार नाही.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी.**

**३-आय.** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण त्याची कर्तव्ये व कार्ये कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला, दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू शकेल.

(२) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती व सेवा यांच्या अटी आणि त्याची वेतनश्रेणी राज्य शासनाकडून सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे ठरवून देण्यात येईल अशी असेल.

(३) अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या व सेवेच्या अटी विनियमांद्वारे वेळोवेळी निर्धारित करण्यात येतील अशा असतील.

(४) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधीक्षणाच्या अधीन राहून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यावर पर्यवेक्षण करेल व नियंत्रण ठेवील.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे आदेश, इत्यादींचे अधिप्रमाणन.**

**३-ज.** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सर्व कामकाज अध्यक्षाच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येईल आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सर्व आदेश आणि संलेख झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या किंवा या संबंधात विनियमांद्वारे प्राधिकृत करण्यात येईल अशा कोणत्याही इतर अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येतील.

**निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

**३-के.** (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राज्य शासन, त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशा धोरणाच्या संबंधात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देऊ शकेल आणि अशा निदेशांचे पालन करणे व त्यानुसार कृती करणे हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणावर बंधनकारक राहील.

(२) (अ) पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, जर राज्य शासनाच्या मते, या अधिनियमांद्वारे किंवा तदन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे किंवा कायद्याअन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचे उल्लंघन करून, प्राधिकरणाच्या कोणत्याही ठरावाची किंवा आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे, किंवा अशा अंमलबजावणीमुळे

प्राधिकरणाच्या निधीचा दुरुपयोग किंवा गैरवापर किंवा अपव्यय होण्याची शक्यता आहे तर, राज्य शासन, लोकहिताच्या दृष्टीने, लेखी आदेशाद्वारे, अशा ठरावाची किंवा आदेशाची अंमलबजावणी रद्द करू शकेल. अशा आदेशाची प्रत, राज्य शासनाकडून, प्राधिकरणाकडे आणि तिच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे ताबडतोब पाठविण्यात येईल.

(ब) वरीलप्रमाणे पाठविलेला आदेश मिळाल्यानंतर, प्राधिकरण, अशा आदेशाचे पालन करण्यास आणि त्याप्रमाणे काम करण्यास बांधिल राहील.

**३-ल.** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे, निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी आणि इतर मत्ता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी धारण केली जाईल आणि तिचा विनियोग केला जाईल. **झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मत्ता, इत्यादींचा विनियोग.**

**३-म.** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे आपला स्वतःचा निधी असेल व ते त्याचे परिरक्षण करील. त्या निधीत,— **झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा निधी.**

(अ) राज्य शासनाकडून अनुदाने, अर्थसहाय्य, या अधिनियमाखाली उभारलेले कर्ज याद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झालेल्या सर्व रकमा ;

(ब) या अधिनियमाखाली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झालेली सर्व फी, खर्च आणि आकार ;

(क) जमिनी, इमारती आणि अन्य स्थावर व जंगम मालमत्ता यांच्या विल्हेवाटीद्वारे, आणि इतर व्यवहाराद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास प्राप्त झालेल्या सर्व रकमा जमा करण्यात येतील ;

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास बँकेतील चालू किंवा ठेव खात्यात निधी ठेवता येईल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता " बँक " म्हणजे,—

१९५५ चा २३. (एक) भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ अन्वये रचना केलेली भारतीय स्टेट बँक ;

१९५९ चा ३८. (दोन) भारतीय स्टेट बँक (दुय्यम बँका) अधिनियम, १९५९ मध्ये व्याख्या केलेली दुय्यम बँक ;

१९७० चा ५. १९८० चा ४०. (तीन) बँकिंग कंपन्या (उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० च्या कलम ३ अन्वये किंवा बँकिंग कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० च्या कलम ३ अन्वये रचना केलेली तत्सम नवीन बँक ;

१९३४ चा २. (चार) राज्य शासनाकडून मान्यता देण्यात येईल अशी, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या कलम २ च्या खंड (ई) मध्ये व्याख्या करण्यात आलेली अनुसूचित बँक असणारी, कोणतीही इतर बँक ;

(३) या बाबतीत प्राधिकृत करण्यात येईल अशा अधिकाऱ्याद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या, त्याच्याकडून अशा खात्यातील पैशांचा व्यवहार करण्यात येईल.

(४) पोट-कलम (२) व (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास आपल्या दैनंदिन व्यवहारासाठी, विहित करण्यात येईल अशा मर्यादेस आणि शर्तीस अधीन राहून त्यास योग्य वाटेल एवढी रक्कम हाती ठेवता येईल.

**३-न.** राज्य शासनाला या बाबतीतील कायद्याद्वारे राज्य विधानमंडळाने यथोचित विनियोजन केल्यानंतर, या अधिनियमाखालील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची कामे पार पाडण्यासाठी शासनाला आवश्यक वाटतील अशी अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे आणि आगाऊ रकमा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देता येतील, आणि देण्यात आलेली सर्व अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे आणि आगाऊ रकमा या राज्य शासन निर्धारित करील अशा अटींवर व शर्तींवर देण्यात येतील. **झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला अनुदान, अर्थसहाय्य, कर्ज आणि आगाऊ रकमा देणे.**

**वित्तीय निवेदन आणि कार्ययोजना.** **३-ओ.** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रत्येक वित्तीय वर्षी विहित करण्यात येईल अशा तारखेपर्यंत, अनुवर्ती वित्तीय वर्षाचे वार्षिक वित्तीय निवेदन आणि कामाचा कार्यक्रम तयार करील आणि मान्यतेसाठी राज्य शासनाकडे सादर करील, आणि राज्य शासनाला, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अशा वित्तीय निवेदनास व कामांच्या कार्यक्रमास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने ती सादर केली असतील तशाच स्वरूपात किंवा त्यात राज्य शासनाला योग्य वाटतील असे फेरफार करून मान्यता देता येईल.

(२) वार्षिक वित्तीय निवेदनात, अनुवर्ती वित्तीय वर्षातील अंदाजित जमा आणि खर्चाच्या रकमा विहित करण्यात येतील अशा स्वरूपात आणि अशा तपशिलासह दर्शविण्यात येतील.

(३) त्या वित्तीय वर्षामध्ये मान्य केलेल्या कामांच्या कार्यक्रमामध्ये फेरफार करण्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सक्षम असेल, मात्र, मंजूर अर्थसंकल्पामध्ये केलेले असे सर्व फेरफार आणि पुर्नविनियोजने पुरवणी वित्तीय निवेदनाद्वारे राज्य शासनाच्या निदर्शनास आणण्यात येतील.

(४) वार्षिक वित्तीय निवेदन आणि कामांचा कार्यक्रम आणि कोणतेही पूरक वित्तीय निवेदन असेल तर त्या निवेदनाची प्रत्येकी एक प्रत या राज्य शासनाला मिळाल्यानंतर राज्य शासनाद्वारे शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्यात येईल.

**लेखे व लेखापरीक्षा.** **३-प.** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण धंदा आणि व्यवहार या संबंधातील लेखा पुस्तके आणि इतर पुस्तके, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने ठेवील.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या लेख्यांची लेखापरीक्षा, ही, राज्य शासनाने भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून करण्यात येईल.

(३) वित्तीय वर्ष संपल्यापासून नऊ महिन्यांच्या आत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण लेखापरीक्षा केलेल्या लेख्यांची एक प्रत, त्यावरील लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या प्रतीसह, राज्य शासनाकडे पाठवील.

(४) पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाकडे अग्रेषित केलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह शक्यतोवर लेखे व अहवाल ज्या वर्षांशी संबंधित असतील त्या वर्षाच्या लगतनंतरचे वर्ष समाप्त होण्यापूर्वी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची, राज्य शासन व्यवस्था करील.

**करारांचे निष्पादन, इत्यादी.** **३-क्यू.** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आलेला मालमत्तेचा प्रत्येक करार व हस्तांतरणपत्र हे लेखी स्वरूपात असेल आणि विनियमांमध्ये तरतूद करण्यात आलेली असेल असा प्राधिकारी किंवा अधिकारी यांच्याद्वारे अशा रीतीने ते निष्पादित करण्यात येईल.

**कर्तव्यपालनात कसूर.** **३-र.** (१) या अधिनियमाद्वारे अथवा तदन्वये लादण्यात आलेले कोणतेही कर्तव्य पार पाडण्यात किंवा लादण्यात आलेले कोणतेही दायित्व पूर्ण करण्यात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कसूर केली आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर, राज्य शासनाला ते काम पार पाडण्यासाठी किंवा दायित्व पूर्ण करण्यासाठी मुदत निश्चित करता येईल आणि तद्नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला नोटीस देता येईल.

(२) अशा प्रकारे निश्चित केलेल्या मुदतीत असे काम पार पाडण्याच्या बाबतीत किंवा अशा दायित्वाची पूर्तता करण्याच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कसूर केली किंवा दुर्लक्ष केले तर राज्य शासनाने, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिक्रमण करून, त्यांची पुनर्रचना करणे कायदेशीर असेल.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिक्रमण केल्यानंतर आणि त्याची पुनर्रचना करण्यात येईपर्यंत, राज्य शासन अथवा या प्रयोजनास्तव राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमण्यात येईल अशा एक किंवा अनेक अधिकारी अथवा अधिकारी मंडळ या अधिनियमाखालील अधिकार वापरील आणि कामे व कर्तव्ये पार पाडील.

(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, अधिक्रमणाच्या मुदतीत, राज्य शासनाकडे निहित असेल.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधिकारांचे प्रत्यायोजन.**

**३-स.** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास या बाबतीतील सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यांना प्रदान करण्यात आलेले कोणतेही अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपविता येतील आणि विशिष्ट असे अधिकार त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्याकडे पुन्हा प्रत्यायोजित करण्यास त्याला परवानगी देता येईल.

**सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृत्यांना रक्षण.**

**३-ट.** हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम किंवा विनियम या अन्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

**अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, सदस्य व अधिकारी, इत्यादी लोकसेवक असणे.**

१८६० च्या ४५. **३-यु.** हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम किंवा विनियमांच्या कोणत्याही तरतुदीस अनुसरून कृती करणारे अथवा ती करीत असल्याचे अभिप्रेत असलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अध्यक्ष, सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**विनियम करण्याचा अधिकार.**

**३-व्ही.** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास या अधिनियमान्वये विनियमांद्वारे तरतूद करावयाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी आणि सर्वसाधारणपणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मते, या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याची कामे पार पाडण्यासाठी तरतूद करणे आवश्यक असेल अशा अन्य सर्व बाबींसाठी हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांच्याशी सुसंगत असे विनियम करता येतील.

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विसर्जित करणे.**

**३-डब्ल्यू.** (१) जर राज्य शासनाची खात्री झाली की झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण चालू ठेवणे अनावश्यक आहे तर शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा तारखेपासून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विसर्जित झाल्याचे घोषित करता येईल व तद्नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विसर्जित झाल्याचे समजण्यात येईल आणि अशा विसर्जनानंतर सदस्य (अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांसह) आपापली पदे सोडून देतील.

(२) उक्त तारखेपासून,—

(अ) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे निहित असलेली किंवा त्याकडून वसुली योग्य असलेली सर्व मालमत्ता, निधी किंवा देय रकमा, राज्य शासनाकडे निहित होतील किंवा त्याच्याकडून त्या वसुलीयोग्य ठरतील ;

(ब) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणावर लादण्यायोग्य असलेली सर्व दायित्वे, राज्य शासनावर लादण्यायोग्य असतील."]

[1][“प्रकरण एक-ब

**संरक्षित भोगवटादार, त्यांचे पुनर्स्थाननिश्चयन आणि पुनर्वसन**

व्याख्या. **३-क्ष.** या प्रकरणामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) “ निवासी बांधकाम ” याचा अर्थ, निवासासाठी किंवा अन्य वापरासाठी असलेले बांधकाम, असा आहे आणि त्यात उपगृह, छपरी, झोपडी किंवा इतर बंदिस्त जागा किंवा बांधकाम-मग ते विटा, चिरे, लाकूड, माती (चिखल), धातू यांचे किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या साहित्याचे असो यांचा समावेश होतो ;

(ब) “ फोटो-पास ” याचा अर्थ, या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी, कलम ३ वाय अन्वये विहित नमुन्यात राज्य शासनाने दिलेले ओळखपत्र-नि-प्रमाणपत्र, असा आहे, आणि त्यात, याबाबतीत दिलेल्या आदेशाद्वारे, शासनाने फोटो-पासला समतुल्य म्हणून घोषित केलेले असे एक किंवा अनेक दस्तऐवज यांचा समावेश आहे ;

(क) “ संरक्षित भोगवटादार ” याचा अर्थ, फोटो-पास धारण करणारा निवासी बांधकामाचा भोगवटादार, असा आहे ;

(ड) “ योजना ” याचा अर्थ, संरक्षित भोगवटादारांच्या संरक्षणासाठी, पुनर्स्थाननिश्चयनासाठी व पुनर्वसनासाठी राज्य शासनाने तयार केलेली किंवा जाहीर केलेली कोणतीही व्यवस्था किंवा योजना, असा आहे ;

फोटो-पास देणे व नोंदवही ठेवणे. **३-य.** (१) शासन किंवा त्याने याबाबतीत सर्वसाधारणपणे किंवा विशेषकरून प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, विहित करण्यात येईल अशा दस्तऐवजाची किंवा अभिलेखांची छाननी केल्यानंतर, १ जानेवारी १९९५ रोजी किंवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या निवासी बांधकामाच्या प्रत्यक्ष भोगवटादारास या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, विहित नमुन्यात फोटो-पास देईल.

(२) जर, पोट-कलम (१) अन्वये दिलेला फोटो-पास गहाळ झाला किंवा नष्ट झाला किंवा विरूपित झाला तर, फोटो-पासधारक, ज्याने असा फोटो-पास दिला आहे अशा संबंधित प्राधिकाऱ्यास फोटो-पास गहाळ, नष्ट किंवा विरूपित झाल्याबाबत तात्काळ कळवील आणि फोटो-पासची दुसरी प्रत मिळण्यासाठी विहित शुल्कासह उक्त प्राधिकाऱ्याकडे, लेखी अर्ज, करील.

(३) पोट-कलम (२) खालील अर्ज प्राप्त झाल्यावर, असा प्राधिकारी अभिलेखांची छाननी केल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी, जर काही असल्यास, केल्यानंतर, अशा फोटो-पासवर **“दुसरी प्रत”** असे स्पष्ट नमूद करून अर्जदारास फोटो-पासची दुसरी प्रत देईल.

(४) दुसरा फोटो-पास दिल्यानंतर जर मूळ फोटो-पास सापडला तर, ज्याने तो दिला होता अशा प्राधिकाऱ्यास तो तात्काळ परत करणे, हे अर्जदाराचे अवश्य कर्तव्य असेल.

(५) शासन, त्याने पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या फोटो-पासची विहित नमुन्यात अद्ययावत नोंदवही ठेवील.

संरक्षित भोगवटादारांचे संरक्षण, पुनर्स्थाननिश्चयन आणि पुनर्वसन. **३झ.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००१ याच्या प्रारंभाच्या दिनांकास व त्यानंतर, पोट-कलम (२) मध्ये तरतूद करण्यात आली असेल ते वगळून, कोणत्याही संरक्षित भोगवटादारास, त्याच्या निवासी बांधकामामधून निष्कासित करण्यात येणार नाही. २००१ चा महा. १०.

(२) संरक्षित भोगवटादारांना, त्यांच्या ताब्यात असलेल्या निवासी बांधकामांमधून निष्कासित करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर, राज्य शासनास,

[1] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ३ द्वारे प्रकरण १-ब आणि कलमे ३क्ष, ३य, ३झ, ३झ-१ व ३झ-२ समाविष्ट करण्यात आली.

याबाबतीत राज्य शासनाने तयार केलेल्या योजनेनुसार किंवा योजनांनुसार त्यांचे पुनर्स्थानिनिश्चयन व पुनर्वसन करण्याच्या शर्तीस अधीन राहून, त्यांना अशा निवासी बांधकामांमधून निष्कासित करता येईल :

परंतु असे की, कोणताही संरक्षित भोगवटादार, पुनर्स्थानिनिश्चयन व पुनर्वसन योजनेच्या अटींचे व शर्तींचे अनुपालन करीत नसेल तर, असा भोगवटादार, अशा पुनर्स्थानिनिश्चयनासाठीचा व पुनर्वसनासाठीचा हक्क गमावील आणि तो पुनर्स्थानिनिश्चयन व पुनर्वसन न करता निष्कासित करण्यास पात्र होईल.

**अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकामे पाडण्याचे सक्षम प्राधिकरणाचे अधिकार.**

**३झ-१.** (१) सक्षम प्राधिकरणाची, कोणत्याही व्यक्तीच्या तक्रारीवरून किंवा त्याच्या अधिकाऱ्याने किंवा पोलिसाने दिलेल्या प्रतिवृत्तावरून किंवा त्याच्या ताब्यात असलेल्या इतर कोणत्याही अभिलेखावरून किंवा माहितीवरून अशी खात्री झाली असेल की, कोणतेही अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकाम किंवा त्याचा भाग, १ जानेवारी १९९५ नंतर, संबंधित सांविधिक प्राधिकरणांची, प्रस्तुत कायद्यान्वये त्याबाबत मिळवणे आवश्यक असलेली परवानगी न घेता, त्याच्या अधिकार क्षेत्रात बांधण्यात आला आहे, किंवा फोटो-पासवर नमूद केलेल्या विद्यमान बांधकामात जादा बांधकाम उभारलेले आहे, तर, ते सक्षम प्राधिकरण, अशा अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकामाच्या मालकावर किंवा त्यात हितसंबंध असल्याचा दावा करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीवर आणि तसेच, अशा बांधकामाचा भोगवटा जिच्याकडे असेल अशा व्यक्तीवर, बांधकाम पाडण्याचा आदेश का देण्यात येऊ नये याबाबत, चोवीस तासात कारणे दाखवा अशी लेखी नोटीस तात्काळ बजावील.

(२) जर अशा अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकामाचा मालक किंवा त्यात हितसंबंध असल्याचा दावा सांगणारी इतर कोणतीही व्यक्ती किंवा अशा बांधकामाचा भोगवटादार, ज्या कोणत्याही कारणामुळे, नोटीस बजावण्यासाठी किंवा स्वीकारण्यासाठी उपलब्ध नसेल तर, अशी नोटीस अशा बांधकामावर ठळक जागी लावण्यात येईल, आणि ती नोटीस संबंधित व्यक्तीवर किंवा व्यक्तींवर योग्य रीतीने बजावली असल्याचे मानण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (२) अन्वये जिच्यावर नोटीस बजावण्यात आली असेल अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती, चोवीस तासांच्या आत सक्षम प्राधिकरणासमोर हजर होतील आणि बांधकाम, पुनर्बांधकाम, जादा बांधकाम किंवा, यथास्थिति, वाढीव बांधकाम करण्यासाठी त्याने आवश्यक ती कायदेशीर परवानगी रीतसर घेतलेली आहे आणि ते बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, जादा बांधकाम किंवा वाढीव बांधकाम अनधिकृत किंवा बेकायदेशीर नाही. हे सिद्ध करण्यासाठी आवश्यक ते दस्तऐवज सादर करील किंवा त्याच्या अभिकर्त्यामार्फत किंवा प्रतिनिधीमार्फत सादर करवील.

(४) सक्षम प्राधिकरण, अशा व्यक्तीने सादर केलेल्या दस्तऐवजांची, कोणतेही असल्यास, छाननी केल्यावर, निवासी बांधकाम, त्याचा जादा किंवा वाढीव भाग अनधिकृत किंवा बेकायदेशीर आहे याबाबत त्याची खात्री पटल्यावर, अशा व्यक्तीने ताबडतोब आणि कोणत्याही परिस्थितीत आदेश दिल्याच्या वेळेपासून चोवीस तासांच्या आत, असे बांधकाम पाडून टाकावे, असा लेखी आदेश तात्काळ देईल :

परंतु, जर मालक किंवा, यथास्थिति, त्या बांधकामामध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगणारी व्यक्ती किंवा अशा बांधकामाचा भोगवटादार किंवा त्याचा अभिकर्ता किंवा प्रतिनिधी नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत सक्षम प्राधिकरणासमोर उपस्थित राहण्यात कसूर करील तर, असे बांधकाम अनधिकृत किंवा बेकायदेशीर असल्याचे समजण्यात येईल आणि सक्षम प्राधिकरण ते पाडून टाकण्याचा आदेश काढील.

(५) असे अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकाम पाडून टाकण्याचा आदेश पोट-कलम (४) किंवा त्याच्या परंतुकाअन्वये दिला आहे अशा बाबतीत, बांधकामाचा मालक किंवा त्यात हितसंबंध असल्याचा दावा करणारी इतर कोणतीही व्यक्ती किंवा अशा बांधकामाचा भोगवटा असणारी व्यक्ती, बांधकाम पाडण्याचा आदेश दिल्याच्या वेळेपासून चोवीस तासांच्या आत ताबडतोब असे बांधकाम पाडून

टाकील आणि जर बांधकाम पाडून टाकण्याचा आदेश जिला दिला आहे अशी संबंधित व्यक्ती त्या मुदतीत असे बांधकाम पाडून टाकण्यात कसूर करील तर, सक्षम प्राधिकरण, आपल्या कर्मचाऱ्यांच्या आणि असे बांधकाम जेथे आहे त्या क्षेत्राच्या पोलीस अधिकाऱ्याच्या मदतीने तात्काळ असे बांधकाम पाडून टाकील, आणि त्याचा मलबा (दगडमातीचा ढिगारा) दूर करील आणि असे बांधकाम पाडून टाकण्यासाठी आणि त्याचा मलबा (दगडमातीचा ढिगारा) दूर करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाला आलेला खर्च वसूल करण्यासाठी, अशा पाडून टाकण्यात आलेल्या बांधकामाच्या मलब्याची विक्री करील. जर केलेला खर्च अशा बांधकामाच्या मलब्याच्या विक्रीच्या उत्पन्नातून भागविणे शक्य नसेल तर, असा खर्च बांधकामाच्या मालकाकडून किंवा त्यात हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून किंवा अशा बांधकामाचा भोगवटा जिच्याकडे होता अशा व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

**अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकामे पाडून टाकणे व दंडाबाबतचे दायित्व.**

**३झ-२.** (१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००१ अंमलात आल्यानंतर, सक्षम प्राधिकरणाची, कोणत्याही व्यक्तीच्या तक्रारीवरून किंवा त्याच्या अधिकाऱ्याने किंवा पोलिसाने दिलेल्या प्रतिवृत्तावरून किंवा त्याच्या ताब्यात असलेल्या इतर कोणत्याही अभिलेखावरून किंवा माहितीवरून अशी खात्री झाली असेल की, कोणतेही अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकाम किंवा त्याचा भाग, संबंधित सांविधिक प्राधिकरणांची, प्रस्तुत कायद्यान्वये त्याबाबत मिळविणे आवश्यक असलेली परवानगी न घेता, त्याच्या अधिकार क्षेत्रात बांधण्यात आला आहे किंवा बांधण्यात येत आहे किंवा अस्तित्वात असलेल्या बांधकामात जादा बांधकाम उभारले आहे किंवा उभारण्यात येत आहे. तेव्हा ते सक्षम प्राधिकरण, अशा अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकामाच्या मालकावर किंवा त्यात हितसंबंध असल्याचा दावा करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीवर आणि तसेच, अशा बांधकामाचा भोगवटा जिच्याकडे असेल अशा व्यक्तीवर, असे बांधकाम पाडण्याचा आदेश का देण्यात येऊ नये याबाबत, चोवीस तासांच्या आत कारणे दाखवा अशी लेखी नोटीस बजावील.

२००१ चा महा. १०.

(२) जर अशा अनधिकृत बांधकामाचा मालक किंवा त्यात हितसंबंध असल्याचा दावा सांगणारी इतर कोणतीही व्यक्ती किंवा अशा बांधकामाचा भोगवटादार, ज्या कोणत्याही कारणामुळे नोटीस बजावण्यासाठी किंवा स्वीकारण्यासाठी उपलब्ध नसेल तर, अशी नोटीस अशा बांधकामावर ठळक जागी लावण्यात येईल, आणि अशी नोटीस संबंधित व्यक्तीवर किंवा व्यक्तींवर योग्य रीतीने बजावण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (२) अन्वये जिच्यावर नोटीस बजावण्यात आली असेल अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती, चोवीस तासांच्या आत सक्षम प्राधिकरणासमोर हजर होतील आणि बांधकाम, पुनर्बांधकाम, जादा बांधकाम किंवा, यथास्थिति, वाढीव बांधकाम करण्यासाठी त्याने आवश्यक ती कायदेशीर परवानगी रीतसर घेतलेली आहे आणि ते बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, जादा बांधकाम किंवा वाढीव बांधकाम अनधिकृत किंवा बेकायदेशीर नाही हे सिद्ध करण्यासाठी आवश्यक ते दस्तऐवज सादर करील किंवा त्याच्या अभिकर्त्यामार्फत किंवा प्रतिनिधीमार्फत सादर करवील.

(४) सक्षम प्राधिकरण, अशा व्यक्तीने सादर केलेल्या दस्तऐवजांची, कोणतेही असल्यास, छाननी केल्यानंतर, निवासी बांधकाम, त्याचा जादा किंवा वाढीव भाग अनधिकृत किंवा बेकायदेशीर आहे याबाबत त्याची खात्री पटल्यावर, अशा व्यक्तीने, ताबडतोब आणि कोणत्याही परिस्थितीत आदेश दिल्याच्या वेळेपासून चोवीस तासांच्या आत असे बांधकाम पाडून टाकावे, असा लेखी आदेश तात्काळ देईल :

परंतु, जर मालक किंवा यथास्थिति, त्या बांधकामामध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगणारी व्यक्ती किंवा अशा बांधकामाचा भोगवटादार किंवा त्याचा अभिकर्ता किंवा प्रतिनिधी नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट

केलेल्या मुदतीत सक्षम प्राधिकरणासमोर उपस्थित राहण्यात कसूर करील तर, असे बांधकाम अनधिकृत किंवा बेकायदेशीर असल्याचे समजण्यात येइल आणि सक्षम प्राधिकरण ते पाडून टाकण्याचा आदेश काढील.

(५) असे अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकाम पाडून टाकण्याचा आदेश पोट-कलम (४) किंवा त्याच्या परंतुकाअन्वये दिला आहे अशा बाबतीत, बांधकामाचा मालक किंवा त्यात हितसंबंध असल्याचा दावा करणारी इतर कोणतीही व्यक्ती किंवा अशा बांधकामाचा भोगवटा असणारी व्यक्ती, बांधकाम पाडण्याचा आदेश दिल्याच्या वेळेपासून चोवीस तासांच्या आत ताबडतोब असे बांधकाम पाडून टाकील आणि जर बांधकाम पाडून टाकण्याचा आदेश जिला दिला आहे अशी संबंधित व्यक्ती त्या मुदतीत असे बांधकाम पाडून टाकण्यात कसूर करील तर, सक्षम प्राधिकरण, आपल्या कर्मचाऱ्यांच्या आणि असे बांधकाम जेथे आहे त्या क्षेत्राच्या पोलीस अधिकाऱ्याच्या मदतीने तात्काळ असे बांधकाम पाडून टाकील आणि त्याचा मलबा (दगडमातीचा ढिगारा) दूर करील आणि असे बांधकाम पाडून टाकण्यासाठी आणि त्याचा मलबा (दगडमातीचा ढिगारा) दूर करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाला आलेला खर्च वसूल करण्यासाठी, अशा पाडून टाकण्यात आलेल्या बांधकामाच्या मलब्याची विक्री करील. जर केलेला खर्च अशा बांधकामाच्या मलब्याच्या विक्रीच्या उत्पन्नातून भागविणे शक्य नसेल तर, असा खर्च बांधकामाच्या मालकाकडून किंवा त्यात हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून किंवा अशा बांधकामाचा भोगवटा जिच्याकडे होता अशा व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

(६) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकामाच्या मालकाने किंवा अशा अनधिकृत बांधकामासाठी जबाबदार असणाऱ्या कोणत्याही इतर व्यक्तीने किंवा अशा अनधिकृत किंवा बेकायदेशीर बांधकामास सहाय्य करणाऱ्या किंवा प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीने किंवा असे बांधकाम अनधिकृत आहे किंवा बेकायदेशीररीत्या बांधलेले आहे असे माहीत असूनही अशा बांधकामाचा भोगवटा जिच्याकडे आहे अशी व्यक्ती, या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी असेल आणि अपराधसिद्धीनंतर तिला एका वर्षापेक्षा कमी नसेल परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची आणि अडीच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(७) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जे सक्षम प्राधिकरण किंवा तिचा कोणताही अधिकारी,—

(एक) बेकायदेशीर किंवा अनधिकृत निवासी बांधकामास सहाय्य करील किंवा प्रोत्साहन देईल ; किंवा

(दोन) पोट-कलम (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे असे बांधकाम पाडून टाकण्यात कोणत्याही पुरेशा कारणाखेरीज कसूर करील,

त्याची अशी केलेली कृती किंवा अकृती ही, या कलमाखालील अपराध असल्याचे मानण्यात येईल आणि अपराधसिद्धीनंतर त्याला एका वर्षापेक्षा कमी नसेल परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि अडीच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल :

परंतु, कोणत्याही अनधिकृत किंवा बेकायदेशीर निवासी बांधकामास सहाय्य केल्याच्या किंवा अनधिकृत निवासी बांधकाम पाडून टाकण्याच्या कर्तव्यात कसूर केल्याच्या कारणावरून, सक्षम प्राधिकरण किंवा

त्याचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरू करण्यापूर्वी, त्याला संबंधित शिस्तविषयक प्राधिकारी आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल :

परंतु, आणखी असे की, सक्षम प्राधिकरण किंवा त्याचा कोणताही अधिकारी, याने सकृतदर्शनी असा अपराध केल्याचे सिद्ध झाल्यावर, संबंधित शिस्तविषयक अधिकाऱ्यास संबंधित प्राधिकरणाला किंवा अधिकाऱ्याला, खटला पूर्ण होईपर्यंत निलंबित करता येईल.

(८) पोट-कलम (६) खालील शिक्षापात्र असलेले अपराध हे दखलपात्र आणि बेजमानती असतील.

(९) सक्षम प्राधिकरणाने किंवा याबाबतीत विशेषतः प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये, दखलपात्र असलेल्या प्रकरणांमध्ये अन्वेषण करण्यासाठी जो सक्षम आहे अशा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने तपासणीसाठी मागणी केली असेल तेव्हा, निवासी बांधकामाच्या भोगवटादारावर तो फोटो-पास तात्काळ सादर करणे बंधनकारक असेल आणि अशा भोगवटादाराने फोटो-पास सादर केला नाही किंवा सादर करण्यात कसूर केली तर, पोलीस अधिकाऱ्यास या कलमान्वये त्या अपराधाची दखल घेण्यासाठी ते पुरेसे कारण किंवा पुरावा असेल : (१९७४ चा २.)

परंतु, प्राधिकरण किंवा त्याचा अधिकारी किंवा पोलीस अधिकारी, कोणत्याही भोगवटादाराच्या फोटो-पासच्या तपासणीसाठीची मागणी सूर्यास्तानंतर किंवा सूर्योदयापूर्वी करणार नाही."]

[१]["प्रकरण एक-क

**झोपडपट्टी क्षेत्रांतील संरक्षित भोगवटादारांसाठी असलेल्या, पूर्वस्थितीत पुनर्वसन करणाऱ्या गृहनिर्माण योजनांसाठी विशेष तरतुदी.**

**व्याख्या.** **३झ-३.**—या प्रकरणामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "गृहनिर्माण समिती" याचा अर्थ, कलम ३झ-४ अन्वये स्थापन केलेली गृहनिर्माण समिती, असा आहे ;

(ब) "गृहनिर्माण योजना" याचा अर्थ, कलम ३क्ष च्या खंड (क) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जे संरक्षित भोगवटादार आहेत अशा झोपडपट्टीवासीयांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी योजनेच्या क्षेत्रामध्ये निवासी घरांचे (युनिट्स) अथवा संरचनांचे बांधकाम किंवा पुनर्बांधकाम करण्याकरिता आणि अशा योजनेच्या क्षेत्रात त्यांचे पूर्वस्थितीत पुनर्वसन करण्याकरिता राज्य शासनाने किंवा भारत सरकारने तयार केलेली व घोषित केलेली योजना, असा आहे ;

(क) "योजना क्षेत्र" याचा अर्थ, या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी, संबंधित गृहनिर्माण समितीकडून योजना क्षेत्र म्हणून **राजपत्रात** घोषित करण्यात आलेले कोणतेही क्षेत्र असा आहे आणि त्यात कलम ४ अन्वये झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या कोणत्याही क्षेत्राचा अंतर्भाव होतो ;

(ड) यात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यामध्ये जे जे अर्थ नेमून देण्यात आले असतील, ते ते अर्थ असतील. (१९६६ चा महा. ३७.)

**गृहनिर्माण समिती घटित करणे.** **३झ-४.**—राज्य शासन, या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी, आदेशाद्वारे प्रत्येक जिल्ह्यासाठी गृहनिर्माण समिती अथवा समित्या स्थापन करील आणि अशा समितीची किंवा, यथास्थिति, समित्यांची रचना व कामे आणि अधिकार व कर्तव्ये ही विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**विकासाची परवानगी.** **३झ-५.**—(१) कोणत्याही गृहनिर्माण योजनेखाली, योजना क्षेत्रातील संरक्षित भोगवटादाराला, विहित केलेल्या रीतीने नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळाल्यानंतर, गृहनिर्माण योजनेच्या अटी व शर्तीनुसार, निवासी संरचनेचे बांधकाम किंवा पुनर्बांधकाम करता येईल.

---

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ द्वारे प्रकरण १-फ आणि कलमे ३झ-३, ३झ-४, ३झ-५, ३झ-६ व ३झ-७ समाविष्ट करण्यात आली.

(२) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, नियोजन प्राधिकरणाला एखाद्या गृहनिर्माण योजनेखालील कोणत्याही विकासाच्या किंवा पुर्नविकासाच्या बाबतीत, आवश्यक वाटतील तेथे तेथे विकास नियंत्रण नियम व विनियम यांसह विकास योजनेच्या किंवा प्रादेशिक योजनेच्या तरतुदी शिथिल करता येतील :

परंतु, हे शिथिलीकरण प्रथम संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांची, किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची लेखी सहमती मिळविल्याशिवाय केले जाणार नाही.

(३) गृहनिर्माण समितीला, याबाबत काढलेल्या विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे राज्य शासनाकडून वेळोवेळी सोपविण्यात येतील अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगती नसणारी इतर आनुषंगिक किंवा संबंधित कार्ये व कर्तव्येदेखील पार पाडता येतील.

१९६६ चा महा. ३७. (४) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमानुसार राज्य शासनास वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल अशा गृहनिर्माण योजनेच्या बाबतीत हाती घेण्यात येणाऱ्या कोणत्याही विकासासाठी, नियोजन प्रधिकरणाला, उक्त अधिनियमान्वये कोणतेही विकास आकार किंवा कोणतीही फी देय असणार नाही.

**या प्रकरणाच्या तरतुदी विवक्षित क्षेत्रांत लागू न होणे.**

**३झ-६.—**या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या प्रकरणातील कोणतीही गोष्ट,—

(अ) भारताच्या राष्ट्रपतींनी भारताच्या संविधानाच्या अनुसूचीत पाचच्या परिच्छेद ६ अन्वये आदेश काढून अनुसूचीत क्षेत्रे म्हणून घोषित केलेली क्षेत्रे ;

१९८० चा ६९. (ब) वन (संरक्षण) अधिनियम, १९८० ज्याला लागू होतो, असे वन क्षेत्र ;

१९८६ चा २९. (क) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम ३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (पाच) अन्वये घोषित करण्यात आलेले सागरी विनियमन क्षेत्र ;

१९८६ चा २९. (ड) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम ३ चे पोट-कलम (१) व पोट-कलम (२) चा खंड (पाच) या अन्वये घोषित करण्यात आल्याप्रमाणे पारिस्थितिक संवेदनाक्षम क्षेत्र आणि पारिस्थितिकीयदृष्ट्या भंगुर क्षेत्रे ;

(ई) राज्य शासनाने अधिसूचित केली असतील अशी थंड हवेची ठिकाणे ;

(फ) केंद्र किंवा राज्य शासनाने घोषित केली असतील अशी विशेष पर्यटन क्षेत्रे ;

(ग) गृहनिर्माण योजनेसाठी स्वेच्छेने देऊ केल्या नसतील अशा, केंद्र सरकारच्या किंवा त्याच्या कोणत्याही संस्थेच्या मालकीच्या जमिनी ;

(ह) राज्य शासनाच्या किंवा संबंधित गृहनिर्माण समितीच्या मतानुसार जे मानवी वसतिस्थानासाठी अयोग्य आहे किंवा ज्यास या प्रकरणाच्या तरतुदी लागू करणे हे लोकहिताचे होणार नाही, असे कोणतेही झोपडपट्टी क्षेत्र ;

यांना लागू होणार नाही.

**राज्य शासनाचे नियंत्रण.**

**३झ-७.—**कलम ३झ-५ च्या पोट-कलम (२) अन्वये अधिकारांचा वापर करणारा प्राधिकारी, राज्य शासन वेळोवेळी फर्माविल असे अहवाल, विवरणे आणि इतर माहिती, राज्य शासनाला सादर करील.”.

प्रकरण दोन

**झोपडपट्ट्या**

**झोपडपट्ट्यांची क्षेत्रे घोषित करणे.**

४. [1][(१) (अ) कोणतेही क्षेत्र हे, अपुऱ्या सोयीमुळे किंवा कोणत्याही मूलभूत सोयी नसल्यामुळे किंवा अनारोग्यकारी, गलिच्छ, दाटीवाटींचे असल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे तेथील किंवा त्याच्या आसपासच्या जनतेच्या आरोग्यास, सुरक्षिततेस किंवा सुखसोयीस अपायकारक झाले आहे किंवा अपायकारक ठरण्याचा संभव आहे ; किंवा

(ब) मानवी वस्तीसाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही क्षेत्रातील इमारती—

(एक) कोणत्याही प्रकारे, मानवी वस्तीसाठी अयोग्य आहेत ; किंवा

(दोन) मोडकळीस आल्यामुळे, दाटीवाटीमुळे, अशा इमारतींची सदोष रचना व सदोष संकल्पचित्रे, रस्त्यांचा अरुंदपणा किंवा सदोष रचना, खेळती हवा, प्रकाश किंवा स्वच्छताविषयक सोयी यांचा अभाव किंवा यापैकी कोणत्याही गोष्टी एकत्र आल्यामुळे त्या क्षेत्रातील लोकांचे आरोग्य, सुरक्षितता, किंवा सोय यांना हानीकारक ठरल्या आहेत ;

अशी सक्षम प्राधिकरणाची खात्री होईल त्याबाबतीत, त्या प्राधिकरणास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ते क्षेत्र झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित करता येईल. अशी घोषणा विहित करण्यात येईल अशा रीतीने (ज्यामुळे त्या क्षेत्रातील घोषणेची यथोचित प्रसिद्धी होईल अशा रीतीने) प्रसिद्ध करण्यात येईल.]

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, इमारती मानवी वस्तीकरिता अयोग्य आहेत किंवा कसे हे ठरविताना, पुढील बाबींसंबंधातील त्यांच्या स्थितीकडे लक्ष देण्यात येईल, त्या म्हणजे,

(अ) दुरुस्त्या ;

(ब) मजबुती ;

(क) ओलाव्यापासून मुक्तता ;

(ड) नैसर्गिक उजेड व हवा ;

(ई) पाणीपुरवठ्याची तरतूद ;

(फ) जलनिःसारणासाठी व स्वच्छताविषयक सोयीसाठी तरतूद ;

(ग) सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी सुविधा ;

व जर इमारत, उक्त बाबींपैकी एका किंवा अधिक बाबींमध्ये इतकी सदोष असेल की, त्यामुळे ती त्या स्थितीत भोगवटा करण्यासाठी वाजवीरीत्या योग्य नसेल तरच ती इमारत, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे अयोग्य असल्याचे समजण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेल्या घोषणेमुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस **राजपत्रात** अशा प्रकारे घोषित केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल. [2][पूर्वोक्तप्रमाणे तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर करण्यात आलेले कोणतेही अपील विचारार्थ घेण्यात येणार नाही.]

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १०२ अनुसूची दोन द्वारे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[2] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][(४) पोट-कलम (३) अन्वये अपील सादर करण्यात आले असेल त्या बाबतीत, न्यायाधिकरण, ज्या स्थानिक क्षेत्रात झोपडपट्टी असेल तेथे खप असलेल्या मराठी भाषेतील वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करून, तसेच त्या झोपडपट्टीत एखाद्या ठळक ठिकाणी जाहीर नोटीस लावून त्याद्वारे त्या झोपडपट्टीतील रहिवाशांना या अपिलासंबंधात त्यांचे कोणतेही आक्षेप असल्यास ते उपरोक्त प्रमाणे वृत्तपत्रात अशी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, स्वतः होऊन किंवा त्या झोपडपट्टीतील ज्या कोणत्याही रहिवासी संघटनेचे ते सदस्य असतील त्या संघटनेमार्फत दाखल करण्याचे आवाहन करील.

(५) पूर्वोक्तप्रमाणे पंधरा दिवसांचा कालावधी संपल्यानंतर, न्यायाधिकरण, अपिलाच्या सुनावणीसाठी एक दिवस निश्चित करील आणि त्या बाबत टपाल दाखला घेतलेल्या पत्राद्वारे अर्जदाराला कळवील आणि झोपडपट्टीमधील एखाद्या ठळक ठिकाणी सुनावणीची नोटीस लावून त्या झोपडपट्टीतील रहिवाशांना कळवील, आणि अर्जदार व रहिवासी किंवा झोपडपट्टीतील त्यांच्या संघटनेचा कोणताही प्रतिनिधी, तेथे उपस्थित असल्यास त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, किंवा ते अनुपस्थित असल्यास त्या रहिवाशांनी किंवा संघटनेने कोणतेही लेखी आक्षेप घेतलेले असल्यास, ते विचारात घेतल्यानंतर, न्यायाधिकरणाला, पोट-कलम (६) च्या तरतुदींच्या अधीन राहून ती घोषणा कायम करण्याचा, त्यात सुधारणा करण्याचा किंवा ती विखंडित करण्याचा आदेश देता येईल, आणि न्यायाधिकरणाचा निर्णय हा अंतिम असेल.

**स्पष्टीकरण.—**पोट-कलम (४) आणि हे पोट-कलम यांच्या प्रयोजनासाठी " झोपडपट्टीतील रहिवाशांची कोणतीही संघटना " या शब्दप्रयोगाचा अर्थ, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० या अन्वये नोंदणी करण्यात आलेली अशा रहिवाशांची कोणतीही संस्था असल्यास, ती संस्था, असा आहे.

१८६० चा २१. १९६१ चा महा. २४.

(६) न्यायाधिकरण अपिलाबाबत निर्णय घेताना, पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकरणाकडून ते क्षेत्र झोपडपट्टी क्षेत्र असल्याचे घोषित करण्यात आल्यानंतर, शासनाचे कोणतेही, अभिकरण किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांनी अशा झोपडपट्टीच्या क्षेत्रामध्ये केलेल्या सुधारणाविषयक कामाकडे दुर्लक्ष करील.]

**विवक्षित झोपडपट्टी सुधार ' क्षेत्रे ' झोपडपट्टी क्षेत्रे असल्याचे मानणे.**

१९७३ चा महा. २३.

[2][**४-अ.** (१) महाराष्ट्र झोपडपट्टी सुधार मंडळ अधिनियम, १९७३ याच्या कलम २६ अन्वये केलेली, कोणतेही क्षेत्र झोपडपट्टी सुधार क्षेत्र असल्याचे घोषित करणारी आणि महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुर्नविकास) (सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या प्रारंभाच्या तारखेच्या (या कलमात यापुढे जिचा उक्त तारीख असा निर्देश केलेला आहे) लगतपूर्वी अंमलात असलेली कोणतीही घोषणा ही उक्त तारखेस व तेव्हापासून, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी तेच क्षेत्र झोपडपट्टी असल्याचे घोषित करणारी, या अधिनियमाच्या कलम ४ अन्वये केलेली घोषणा असल्याचे मानण्यात येईल.

१९७६ चा महा. २०.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त तारखेपासून तीस दिवसांच्या आत, या अधिनियमान्वये कार्य करणाऱ्या न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल.

(३) असे अपील करण्यात आल्यावर न्यायाधिकरणास, घोषणा कायम करणारा, तीमध्ये फेरबदल करणारा किंवा ती विखंडित करणारा आदेश देता येईल ; आणि न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.]

[1] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ द्वारे पोट-कलम (४) ऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[2] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ द्वारे पोट-कलम (४अ) समाविष्ट करण्यात आले.

प्रकरण तीन

## झोपडपट्ट्यांची सुधारणा

**सुधार कामे पार पाडण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार.** [१][**५.** (१) सक्षम प्राधिकरणाची अशी खात्री झाली असेल की, कोणतेही झोपडपट्टी क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग, त्या क्षेत्रातील लोकांचे आरोग्य, सुरक्षितता किंवा सोय यांस अपायकारक होणार नाही अशारीतीने, वाजवी खर्चाने, सुधारणा करता येण्याजोगा आहे, त्याबाबतीत, त्या प्राधिकरणास त्याच्या मते आवश्यक असतील अशी सुधार कामे पार पाडण्याचा आपला उद्देश असल्याचे कळवणारी नोटीस, त्या क्षेत्रातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील मालमत्तांच्या मालकावर किंवा मालकांवर आणि प्रत्येक गहाणदारावर, बजावता येईल आणि त्यांच्या हरकती किंवा सूचना, कोणत्याही असल्यास, त्या अशा नोटिशीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्याबद्दल त्या प्रत्येकास अशा नोटिशीद्वारे सांगता येईल. अशा नोटिशीची एक प्रत, त्या क्षेत्राच्या भोगवटादारांच्या माहितीसाठी तसेच, त्यांच्या हरकती किंवा सूचना, कोणत्याही असल्यास, त्या सादर करण्याची संधी त्यांना मिळावी म्हणून त्या क्षेत्रातील कोणत्याही ठळक जागी लावण्यात येईल. नोटीस अशा रीतीने लावल्यानंतर मालक, भोगवटादार आणि इतर सर्व संबंधित व्यक्ती यांना, त्या नोटिशीत नमूद केलेल्या बाबी यथोचितरीत्या कळविल्या असल्याचे समजण्यात येईल.

(२) मालक, भोगवटादार आणि इतर संबंधित व्यक्ती यांच्याकडून, उपरोक्त वेळेच्या आत मिळालेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्यानंतर सक्षम प्राधिकरणास, फेरफारांसह किंवा फेरफारांशिवाय सुधार कामे पार पाडण्याचा निर्णय घेऊन त्यांचा प्रारंभ करता येईल किंवा विवक्षित मुदतीपर्यंत उक्त कामे पुढे ढकलता येतील किंवा अशी कामे हाती घेण्याचा उद्देश रद्द करता येईल.

**सुधार कामे.** **५अ.** [२][या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ] सुधार कामांमध्ये पुढील सर्व कामे किंवा कोणत्याही गोष्टींचा समावेश होईल :—

(अ) पाण्याचे मुख्य नळ घालणे, मलप्रणाल (sewers) व पावसांचे पाणी वाहून जाण्यासाठी गटारे बांधणे ;

(ब) मुताऱ्या, शौचकूप, सामुदायिक स्नानगृहे व पाण्याचे नळ यांची तरतूद करणे ;

(क) विद्यमान रस्ते, बोळ व वाटा रूंद करणे, त्यांचे नव्याने सीमारेखन करणे किंवा त्यांची फरसबंदी करणे व नवीन रस्ते, बोळ व वाटा बांधणे ;

(ड) सडकेवर दिवाबत्तीची व्यवस्था करणे ;

(ई) त्या क्षेत्रामध्ये तासणी, भराव काम, समतलन व दृश्य आलेखन करणे ;

(फ) उपवने, खेळाची मैदाने, कल्याण केंद्र व समाज केंद्र, शाळा, दवाखाने, रुग्णालये, पोलीस ठाणी, अग्निशामक केंद्र व ना नफा तत्त्वावर चालविण्यात येणाऱ्या इतर सोयी यासारख्या अनुत्पादक प्रयोजनार्थ, जमीन पुरविण्याच्या हेतूने उक्त क्षेत्राचा आंशिक विकास करणे ;

(ग) अडथळा निर्माण करणाऱ्या किंवा मोडकळीस आलेल्या इमारती किंवा त्यांचे भाग पाडून टाकणे ;

(ह) उक्त क्षेत्र, सुरक्षितता किंवा आरोग्य यास अपायकारक किंवा उपद्रावकारक असण्यास किंवा होण्यास प्रतिबंध करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाच्या मते ज्या गोष्टीची तरतूद करणे इष्ट असेल अशी इतर कोणतीही बाब.

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १०२ अनुसूची दोन द्वारे मूळ कलम ५ ला ५क असा क्रमांक देण्यात आला आणि या नवीन कलम ५क पूर्वी कलमे ५, ५अ आणि ५ब जादा दाखल करण्यात आली.

[२] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ४ द्वारे “लगतपूर्वीच्या कलमाच्या” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**५ब.** (१) सक्षम प्राधिकरण, कोणत्याही क्षेत्रात सुधार कामे हाती घेईल आणि त्यातील भोगवटादारांपैकी कोणत्याही भोगवटादाराने त्यांच्या जागा रिकाम्या करणे आवश्यक आहे असे त्याचे मत होईल त्याबाबतीत ते त्यांना विनिर्दिष्ट तारखेपर्यंत किंवा तारखांपर्यंत उक्त जागा रिकाम्या करण्याबद्दल नोटीस देईल. व्यवहार्य असेल तेथवर ते अशा भोगवटादारांना इतर कोणत्याही क्षेत्रात पर्यायी जागा देऊ करील. जर कोणताही भोगवटादार विनिर्दिष्ट मुदतीच्या आत जागा रिकामी करण्यात व त्याला देऊ करण्यात आलेल्या पर्यायी जागेत जाण्यास कसूर करील तर, त्याच्यासाठी पर्यायी जागेची तरतूद करण्यासंबंधीची सक्षम प्राधिकरणाची जबाबदारी संपुष्टात येईल.

**भोगवटादारांना जागा रिकाम्या करावयास भाग पाडण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार.**

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याबाबतीत कोणताही भोगवटादार त्याची जागा रिकामी करणार नाही त्याबाबतीत, सक्षम प्राधिकरणास, जागा रिकामी करविण्यासाठी त्यास वाजवीरीत्या आवश्यक वाटेल अशा उपाययोजना व अशा बळाचा वापर करता किंवा तसे करण्याची व्यवस्था करता येईल.

(३) सक्षम प्राधिकरणास, पोट-कलम (२) अन्वये काढून टाकण्यात आलेल्या व्यक्तींना पूर्ण १५ दिवसांची नोटीस दिल्यानंतर आणि तिची एक प्रत उक्त क्षेत्रातील ठळक ठिकाणी लावल्यानंतर, त्या जागेतील उर्वरित कोणतीही मालमत्ता काढून टाकता येईल किंवा ती काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल किंवा जाहीर लिलावाद्वारे तिची विल्हेवाट लावता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये मालमत्ता विकण्यात येईल त्याबाबतीत विक्रीपासून मिळालेले उत्पन्न हे ते मिळण्याचा अधिकार असेल अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींना विक्रीसाठीचा खर्च वजा करून देण्यात येईल :

परंतु, शिल्लक रक्कम कोणत्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना देण्यात यावी याबाबत किंवा तिचे विभाजन करण्याच्या बाबतीत निर्णय करणे सक्षम प्राधिकरणास शक्य नसेल तर, ते, असा वाद सक्षम अधिकारिता असणाऱ्या दिवाणी न्यायालयाकडे निर्देशित करील व उक्त न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल.

[१][**५क.** (१) आपल्या कोणत्याही अधिकाऱ्यांच्या प्रतिवृत्तावरून किंवा त्याच्याकडे असलेल्या इतर माहितीवरून सक्षम प्राधिकाऱ्याची अशी खात्री झाली असेल की, झोपडपट्टीतील कोणत्याही इमारती कोणत्याही प्रकारे मानवी वस्तीस अयोग्य आहेत, किंवा कोणत्याही झोपडपट्टीमध्ये कोणत्याही मूलभूत सुखसोयी नसल्यामुळे किंवा सुखसोयी अपुऱ्या असल्यामुळे किंवा ती अनारोग्यकारी, घाणेरडी, अतिगर्दीची असल्यामुळे किंवा अन्यथा अशा धोक्याचे कारण असल्यामुळे ती झोपडपट्टी किंवा तिचा कोणताही भाग यामुळे त्या वस्तीमधील किंवा तिच्या आसपासच्या जनतेचे आरोग्य, सुरक्षितता किंवा सोय यांना धोका निर्माण झाला आहे किंवा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, अशा बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्यास त्याच्या मते त्या इमारती किंवा वस्ती वाजवी खर्चाने अशा प्रकारे योग्य करणे किंवा अशा धोक्यापासून मुक्त करणे शक्य नसेल त्याखेरीज त्या इमारतीच्या किंवा त्या वस्तीतील जमिनीच्या मालकांवर नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तीस दिवसांपेक्षा कमी नसलेल्या मुदतीच्या आत नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी सुधारणाविषयक बांधकामे इमारतींच्या किंवा वस्तीच्या आत किंवा बाहेर करण्यास फर्मावणारी आणि अशा बांधकामामुळे त्या इमारतीत किंवा वस्तीत मनुष्यास राहाण्यास योग्य किंवा, यथास्थिति, अशा धोक्यापासून मुक्त होतील असे प्राधिकाऱ्याचे मत असल्याचे नमूद करणारी नोटीस बजावता येईल.

**मानवी वस्तीस अयोग्य असणाऱ्या इमारतींची व आरोग्य इत्यादीस धोका निर्माण होण्याचे कारण होणाऱ्या क्षेत्रांची सुधारणा करण्यास भाग पाडण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार.**

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५ द्वारे मूळ कलमाऐवजी कलम ५क दाखल करण्यात आले.

(२) या कलमान्वये मालकांवर नोटीस बजावण्याव्यतिरिक्त सक्षम प्राधिकाऱ्यास इमारतीच्या किंवा जमिनीची गहाणदार व्यक्ती असल्याबद्दल खात्री करून घेणे संयुक्तिकपणे व्यवहार्य असेल तेथवर, अशा प्रत्येक गहाणदारावर नोटिशीची प्रत बजावता येईल आणि त्याखेरीज, झोपडपट्टीमधील रहिवाशांच्या माहितीसाठी अशा नोटिशीची एक प्रत त्या झोपडपट्टीतील एखाद्या ठळक ठिकाणी देखील लावण्यात येईल. अशी नोटीस लावणे हे, मालक, रहिवासी आणि इतर संबंधित व्यक्ती यांना नोटिशीमध्ये नमूद करण्यात आलेला मजकूर यथोचितरीत्या कळवण्यात आला असल्याचा निर्णायक पुरावा असेल.

(३) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, पूर्वोक्तप्रमाणे, वाजवी खर्च करून इमारती मानवी वस्तीयोग्य करता येतील किंवा काय किंवा वस्ती धोक्यापासून मुक्त करता येईल किंवा काय हे निश्चित करताना, या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेल्या बांधकामांचा अंदाजित खर्च आणि बांधकामे पूर्ण झाल्यानंतर इमारतींची किंवा जमिनींची अंदाजित किंमत विचारात घेण्यात येईल.]

**सुधारविषयक बांधकामे करण्यास भाग पाडणाऱ्या नोटिशीची बजावणी.**

**६.** (१) इमारतींच्या मालकांना किंवा, यथास्थिति, [१][*****] जमिनीच्या मालकांना, सुधारविषयक बांधकामे करण्यास [२][कलम ५क] अन्वये भाग पाडणाऱ्या नोटिशीचे अनुपालन करण्यात आले नाही तर नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यानंतर सक्षम प्राधिकरणास, नोटिशीद्वारे करणे आवश्यक असलेली कामे स्वतः करता येतील.

(२) सक्षम प्राधिकरणाने या कलमान्वये केलेला सर्व खर्च, खर्चाची मागणी केल्याच्या तारखेपासून तो देण्यात येईतोपर्यंत, राज्य शासन आदेशाद्वारे निश्चित करील अशा दराने व्याजासह इमारतींच्या मालकांकडून किंवा [१][****] जमिनीच्या मालकांकडून, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

परंतु, कोणताही मालक असे सिद्ध करील की,—

(अ) तो इतर कोणत्याही व्यक्तींचा केवळ एजंट म्हणून किंवा विश्वस्त म्हणून भाडे घेतो ; आणि

(ब) त्याच्याकडे इतर व्यक्तींच्या वतीने प्राधिकरणाची संपूर्ण मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे पैसे नाहीत तर, उपरोक्तप्रमाणे त्याच्याकडे असेल त्या संपूर्ण रकमेपर्यंत त्याचे दायित्व मर्यादित होईल.

**सुधारविषयक बांधकामाच्या परिरक्षणाचा भोगवटादाराकडून वसूल करावयाचा खर्च.**

[३][**७.** कलम ५, ५-क आणि ६ यांच्या तरतुदींस अनुसरून, कोणत्याही झोपडपट्टीतील कोणत्याही इमारतीच्या अथवा इमारतींच्या संबंधात, सुधार कामे करण्यात आली असतील त्या बाबतीत, सक्षम प्राधिकरणाने, किंवा, यथास्थिति, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने, अशा सुधार कामांच्या परिरक्षणासाठी अथवा अशा कामामुळे निर्माण झालेल्या सोयी अथवा अशा सवलतींच्या उपभोगाच्या संबंधात केलेला खर्च, संबंधित वस्तीत अथवा इमारतीत राहणाऱ्या भोगवटादारांकडून सेवाआकार म्हणून वसुलीयोग्य असेल, आणि देय रक्कम, विनिर्दिष्ट मुदतीत देण्यात आली नाही, तर ती संबंधित भोगवटादारांकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असेल.]

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६ द्वारे "ज्या जमिनीवर उभ्या असतील अशा" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १०२ अनुसूची दोन द्वारे "कलम ५" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १०२ अनुसूची दोन द्वारे मूळ कलम ७ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

**८.** (१) सक्षम प्राधिकरणास **राजपत्रातील** (आणि तसेच विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रसिद्ध केलेल्या) अधिसूचनेद्वारे निदेश देता येईल की, कोणत्याही व्यक्तीने, सक्षम प्राधिकरणाच्या लेखी पूर्व-परवानगीखेरीज, झोपडपट्टीत कोणतीही इमारत उभारता कामा नये. **झोपडपट्टी क्षेत्रातील इमारती इत्यादींवरील निर्बंध.**

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना, तिच्या तारखेपासून दोन वर्षांची किंवा राज्य शासन, **राजपत्रातील** (आणि तसेच विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने प्रसिद्ध केलेल्या) अधिसूचनेद्वारे, याबाबतीत वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी आणखी पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल अशी मुदत किंवा अशा मुदती संपल्यानंतर, अधिसूचना अंमलात असण्याचे बंद होण्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या बाबतीत असेल त्याखेरीज, अंमलात असण्याचे बंद होईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली परवानगी मिळवू इच्छिणारी प्रत्येक व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा नमुन्यांमध्ये आणि ज्या इमारतींच्या संबंधात अर्ज करण्यात आला असेल त्या इमारतीच्या उभारणी संबंधातील अशी माहिती अंतर्भूत असलेला लेखी अर्ज सक्षम प्राधिकरणाकडे करील.

(४) असा अर्ज मिळाल्यानंतर, सक्षम प्राधिकरण, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे,—

(अ) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, कोणत्याही असल्यास, अटी किंवा शर्ती यांस अधीन राहून परवानगी देईल ; किंवा

(ब) अशी परवानगी देण्यास नकार देईल ;

परंतु, अशी परवानगी नाकारणारा आदेश देण्यापूर्वी, अर्जदारास, अशी परवानगी का नाकारण्यात येऊ नये या संबंधात कारणे दर्शविण्याची संधी देण्यात येईल.

(५) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट,—

(अ) [१][कलम ५ किंवा ५ क] ; पोट-कलम (१) खालील नोटिशीअन्वये किंवा कलम ९, पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या हमीस अनुसरून, करणे आवश्यक असलेल्या, कोणत्याही सुधारविषयक बांधकामास ; किंवा

(ब) ज्या क्षेत्राच्या संबंधात कलम १२ अन्वये झोपडपट्टी निर्मूलन आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही क्षेत्रात कोणतीही इमारत उभारणे, यास लागू होणार नाही.

**९.** (१) सक्षम प्राधिकरणाची, त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या प्रतिवृत्तावरून किंवा त्याच्याकडे आलेल्या इतर माहितीवरून अशी खात्री झाली असेल की, झोपडपट्टीतील कोणतीही इमारत मनुष्यवस्तीसाठी अयोग्य आहे आणि वाजवी खर्चाने ती इमारत अशा रीतीने योग्य करणे शक्य नाही, त्याबाबतीत ते इमारतीच्या मालकावर आणि इमारतीमध्ये पट्टेदार किंवा गहाणदार म्हणून किंवा अन्यथा हितसंबंध असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीवर, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत, इमारत पाडण्याचा आदेश का देण्यात येऊ नये यासंबंधीची कारणे दर्शविण्यासाठी, नोटीस बजावील. **मानवी वस्तीसाठी अयोग्य असलेल्या इमारती पाडण्याचा आदेश देण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार.**

(२) ज्या व्यक्तींवर पोट-कलम (१) अन्वये नोटीस बजावण्यात आली असेल अशा व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती, त्या अनुसार सक्षम प्राधिकरणासमोर उपस्थित होईल व प्राधिकरणाच्या मते ती इमारत मनुष्यवस्तीसाठी योग्य होईल अशा प्रकारचे इमारतीच्या संबंधात, प्राधिकरण विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत, सुधारविषयक बांधकाम करील तर किंवा त्या प्रयोजनाच्या मानवी वस्तीसाठी इमारत योग्य

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ७ द्वारे "कलम ५क" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

झाली आहे अशी खात्री पटल्यावर, प्राधिकरण हमी रद्द करीतोपर्यंत ती इमारत, माणसांना राहण्यासाठी, म्हणून वापरणार नाही अशी हमी प्राधिकरणास देईल तर, प्राधिकरण इमारत पाडण्यासंबंधीचा कोणताही आदेश देणार नाही.

(३) जर पोट-कलम (२) मध्ये उल्लेखिलेली कोणतीही हमी देण्यात आली नसेल किंवा अशी कोणतीही हमी दिली असेल अशा बाबतीत, अशी हमी ज्या संबंधात देण्यात आली असेल असे कोणतेही सुधारविषयक बांधकाम, विनिर्दिष्ट मुदतीत, करण्यात आलेले नसेल किंवा हमीच्या अटींचे उल्लंघन करून, कोणत्याही वेळी, त्या इमारतीचा वापर केला असेल तर, सक्षम प्राधिकरण, ताबडतोब इमारत पाडण्याबद्दलचा आदेश देऊन आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांपेक्षा कमी नसेल अशा, आदेशात विनिर्दिष्ट करावयाच्या मुदतीत, इमारत रिकामी करण्यास भाग पाडील आणि उक्त मुदत संपल्यानंतर, सहा आठवड्यांच्या आत, उक्त इमारत पाडण्यात येईल :

परंतु असा कोणताही आदेश देण्यात येण्यापूर्वी, सक्षम प्राधिकरण अशा रीतीने इमारत पाडण्यामुळे जे भोगवटादार बेघर होणार असतील त्यांच्या निवासाकरिता व्यवहार्य असेल तेथवर, आगाऊ जागा प्राप्त करील.

**इमारत पाडण्याचा आदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**१०.** (१) कलम ९ अन्वये इमारत पाडण्याचा आदेश देण्यात आला असेल, त्या बाबतीत इमारतीचा मालक किंवा हितसंबंध असलेली इतर कोणतीही व्यक्ती, आदेशाद्वारे त्याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत, इमारत पाडील ; आणि जर त्या मुदतीत इमारत पाडण्यात आली नाही तर, सक्षम प्राधिकरण इमारतीत प्रवेश करील व ती पाडील व तिच्यातील सामानाची विक्री करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकरणाने केलेला कोणताही खर्च इमारतीमधील सामानाच्या विक्रीच्या उत्पन्नामधून भागवता आला नाही तर तो, इमारतीच्या मालकाकडून किंवा तिच्यात हितसंबंध असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, वसूल करण्यायोग्य असेल.

**सुधार कामे व इतर कामे सोपवण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार.**

[1][**१०अ.** कोणत्याही झोपडपट्टीत, सक्षम प्राधिकरणास राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने आणि कबूल करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर आणि त्या प्रयोजनासाठी तिच्याकडून मान्यता देण्यात आलेल्या कोणत्याही एजन्सीकडे पुढील गोष्टी सोपविता येतील :—

(अ) त्याच्या स्वतःच्या देखरेखीखाली, कोणत्याही सुधारविषयक, निर्मूलनविषयक अथवा पुनर्विकासविषयक कामाचे कार्यान्वयन ;

(ब) त्याच्या नियंत्रणाखालील अशा कोणत्याही कामांचे परिरक्षण किंवा दुरुस्ती ;

(क) प्राधिकरणाकडून वसुलीयोग्य असलेला व त्याला देय असलेला सेवा खर्च गोळा करण्याचे काम.]

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १०२ अनुसूची दोन द्वारे कलम १०अ जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण चार

## झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्विकास

**कोणतेही झोपडपट्टी क्षेत्र, निर्मूलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा अधिकार.**

**११.** (१) सक्षम प्राधिकरणाची, त्याच्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याच्या प्रतिवृत्तावरून किंवा उक्त प्राधिकारणाजवळ असलेल्या इतर माहितीवरून, कोणत्याही झोपडपट्टी क्षेत्राच्या बाबतीत अशी खात्री झाली असेल की, त्या क्षेत्रातील परिस्थितीला तोंड देण्याची सर्वात समाधानकारक पद्धती म्हणजे त्या क्षेत्रातील सर्व इमारती पाडून टाकणे ही होय, तर प्राधिकरण, जी इमारत मानवी वसतिस्थानासाठी अयोग्य नाही किंवा आरोग्यास धोकादायक वा हानिकारक नाही, अशी कोणतीही इमारत, त्या क्षेत्रातून वगळली जाईल अशा रीतीने, नकाशावर ते क्षेत्र सीमांकित करण्याची व्यवस्था करील व त्यानंतर प्राधिकरण, **राजपत्रात,** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे असे सीमांकित केलेले क्षेत्र हे निर्मूलन क्षेत्र म्हणजेच, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार ज्यातील सर्व इमारती पाडून टाकवयाच्या आहेत असे क्षेत्र असल्याचे जाहीर करील. या आदेशाला विहित करण्यात येईल अशा रीतीने, व्यापक प्रसिद्धीही देण्यात येईल.

(२) कोणतेही क्षेत्र, निर्मूलन क्षेत्र असल्याचे घोषित करण्यात येण्यापूर्वी, सक्षम प्राधिकरण आपल्या साधनसंपत्तीच्या पुरेपणाविषयी स्वत:ची खात्री करून घेईल व अशा क्षेत्रातील ज्या व्यक्ती बेघर होण्याची शक्यता आहे त्या व्यक्तींची संख्या निश्चित करील आणि त्यानंतर बेघर झालेल्या व्यक्तींना, शक्य तितक्या कमी हालअपेष्टा सोसाव्या लागतील हे सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने व्यवहार्य असतील असे उपाय योजील, मग ते त्याच्या कार्यक्रमाच्या व्यवस्थेद्वारे योजण्यात येवोत किंवा त्या क्षेत्रात किंवा त्याच्या वेगवेगळ्या भागात इमारती पाडण्याचे काम जसजसे चालू राहील, तसतसे विस्थापनांच्या अगोदर, वेळोवेळी जी निवासव्यवस्था आवश्यक होईल ती, व्यवहार्य असेल तितपत, प्राप्त करून, योजण्यात येवोत किंवा अन्य कोणत्याही रीतीने योजण्यात येवोत. राज्य शासनास, प्रकरण पाचच्या तरतुदींच्या आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन राहून, या पोट-कलमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ नियम करता येतील आणि या तरतुदींच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमामध्ये, सक्षम प्राधिकरणाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस, ज्या व्यक्ती निर्मूलन क्षेत्रात असलेल्या इमारतीचा भोगवटा करीत असतील त्या व्यक्तींची संख्या व नावे निश्चित करणे; जे बेघर होतील अशा व्यक्तींसाठी कायम किंवा तात्पुरत्या स्वरूपात द्यावयाच्या जागेचे निश्चित स्थान व त्याच्यासाठी तरतूद करावयाच्या फरसबंदी क्षेत्राची मर्यादा, इमारत पुन्हा बांधण्यात आल्यानंतर तिचा भोगवटा करणे, बेघर होतील अशा व्यक्तींसाठी तरतूद केलेल्या तात्पुरत्या जागेच्या संबंधात द्यावयाचे भाडे, तात्पुरत्या जागेची तरतूद केलेल्या व्यक्तींना ज्या परिस्थितीत जागेतून काढून लावता येईल ती परिस्थिती आणि उपरोक्त बाबींशी संबंधित असतील अशी प्रयोजने, याबाबत तरतूद करता येईल. कलम ४६, पोट-कलम (२) च्या तरतुदी उक्त कलमान्वये केलेल्या नियमांस ज्याप्रमाणे त्या लागू होतात त्याचप्रमाणे त्या या कलमान्वये केलेल्या नियमासंबंधात लागू होतील.

(३) सक्षम प्राधिकरण या कलमाखालील घोषणांची एक प्रत, नकाशासह आणि निर्मूलन क्षेत्रात समाविष्ट केलेल्या इमारतींचा ज्या व्यक्ती, सक्षम प्राधिकरणाकडून पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस, भोगवटा करीत होत्या त्या व्यक्तींच्या संख्येबाबतच्या विवरणपत्रासह, प्रशासकाकडे ताबडतोब पुढे पाठवील.

**निर्मूलन आदेश.**

**१२.** (१) सक्षम प्राधिकरण, कोणतेही झोपडपट्टीचे क्षेत्र निर्मूलन क्षेत्र असल्याचे त्याने जाहीर केल्यानंतर शक्य तितक्या लवकर त्या क्षेत्राच्या बाबतीत निर्मूलन आदेश देईल व त्याद्वारे त्यात विनिर्दिष्ट केलेल्या इमारतींपैकी प्रत्येक इमारत पाडून टाकण्याचा आदेश देईल व आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या आत प्रत्येक इमारत रिकामी करण्याबद्दल फर्मावील आणि तो [१][निर्मूलन आदेश] कायम करण्यासाठी प्रशासकाकडे सादर करील.

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २(१) द्वारे "आदेश" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) प्रशासकास, एकतर [१][निर्मूलन आदेश] पूर्णतः किंवा त्यास आवश्यक वाटत असतील अशा फेरफारांच्या अधीन, कायम करता येईल, किंवा तो [१][निर्मूलन आदेश] फेटाळता येईल.

(३) [१][निर्मूलन आदेश] कायम करण्यात येताच, प्रशासक, विहित करण्यात येईल अशा रीतीने नोटीस प्रसिद्ध करील, अशा नोटिशीत, [१][निर्मूलन आदेश], कायम करण्यात आला आहे हे तो नमूद करील व कायम केलेल्या [१][निर्मूलन आदेशाची] प्रत ज्या ठिकाणी सर्व वाजवी वेळी पाहता येईल त्या ठिकाणाचे नाव नमूद करील व त्या आदेशात निर्दिष्ट केलेला नकाशा सर्व वाजवी वेळी पहाता येईल हेही नमूद करील.

(४) प्रशासकाच्या [१][निर्मूलन आदेशामुळे] पीडित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस [१][निर्मूलन आदेश] कायम केल्याची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सहा आठवड्यांच्या आत न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल व न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

(५) असे कोणतेही अपील [२][रीतसर करण्यात येईल त्या बाबतीत],—

(एक) [३][न्यायाधिकरणास, किंवा अध्यक्षास अंतरिम आदेशाद्वारे] [१][निर्मूलन आदेशाचे] प्रवर्तन, एकतर सर्वसाधारणपणे किंवा त्याचा कोणत्याही मालमत्तेवर जेथवर परिणाम होत असेल तेथवर, अपिलाचा अंतिम निर्णय करण्यात येईपर्यंत, स्थगित करता येईल; आणि

(दोन) अपिलाच्या सुनावणीनंतर [४][न्यायाधिकरणाची जर अशी खात्री झाली] की, [१][निर्मूलन आदेश] या अधिनियमाच्या अधिकाराच्या कक्षेत येत नाही किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे पालन न करण्यात आल्यामुळे अपीलदाराच्या हितसंबंधास मोठ्या प्रमाणावर बाध आला असेल तर, [१][निर्मूलन आदेश] एकतर सर्वसाधारणपणे किंवा जेथवर त्याचा अपीलदाराच्या कोणत्याही मालमत्तेवर परिणाम होत असेल तेथवर, रद्दबातल करता येईल.

(६) लगतपूर्ववर्ती पोट-कलमाच्या तरतुदीस अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार, ज्या तारखेस आदेश कायम करण्यात आल्याची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या तारखेपासून सहा आठवडे समाप्त होताच तो [१][निर्मूलन आदेश] परिणामकारक होईल.

(७) [१][निर्मूलन आदेश] परिणामकारक झाला असेल त्यावेळी, ज्या इमारतींना [१][निर्मूलन आदेश] लागू होतो, त्या इमारतीच्या मालकांनी ज्या तारखेस [१][निर्मूलन आदेशाद्वारे] इमारती रिकाम्या करण्याबद्दल फर्माविण्यात आले असेल त्या तारखेपासून सहा आठवडे समाप्त होण्यापूर्वी किंवा प्रकरणाच्या परिस्थितीनुसार सक्षम प्राधिकरणास वाजवी वाटेल असा दीर्घतर कालावधी समाप्त होण्यापूर्वी, इमारती पाडल्या पाहिजेत.

(८) पोट-कलम (७) मध्ये उल्लेखिण्यात आलेली मुदत संपण्यापूर्वी इमारती पाडून टाकण्यात आल्या नसतील तर, सक्षम प्राधिकरणास इमारतीमध्ये प्रवेश करता येईल व इमारती पाडून टाकता येतील आणि इमारतीच्या सामानाची विक्री करता येईल.

---

[१] सन १९७५ महाराष्ट्र अधिनियम क्र. ४६ याच्या कलम २ (१) द्वारे "आदेश" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (अ) द्वारे "रीतसर करण्यात येईल त्याबाबत न्यायाधिकरणास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (ब) द्वारे "अंतरिम आदेशाद्वारे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (क) द्वारे "जर अशी खात्री झाली तर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(९) कोणत्याही इमारती पाडताना सक्षम प्राधिकरणाने केलेला कोणताही खर्च सामानाच्या विक्रीद्वारे मिळालेली कोणतीही रक्कम नावे जमा केल्यानंतर, सक्षम प्राधिकरणास, इमारतीच्या मालकांकडून किंवा तिच्यात हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल, आणि सक्षम प्राधिकरणाच्या हाती अतिरिक्त रक्कम शिल्लक राहिल्यास ती इमारतीच्या मालकाला देण्यात येईल किंवा एकाहून अधिक मालक असतील तर, ते मालक सहमत होतील त्याप्रमाणे देण्यात येईल. मालकांमध्ये एकमत न झाल्यास, सक्षम प्राधिकरण ती अतिरिक्त रक्कम, बृहन्मुंबईत, मुंबई शहर दिवाणी न्यायालयात आणि इतर ठिकाणी जिल्हा न्यायालयात जमा करील आणि ती अतिरिक्त रक्कम मालकांमध्ये वाटण्यासंबंधीच्या प्रश्नावरील मुख्य न्यायाधीशाचा किंवा यथास्थिति, जिल्हा न्यायाधीशाचा निर्णय अंतिम असेल.

(१०) या अधिनियमाच्या आणि नगररचनेसंबंधी व इमारती उभारण्याचे नियमन करण्यासंबंधी त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदीस अधीन राहून निर्मूलनाचा आदेश परिणामकारक झालेला असेल त्याबाबतीत, ज्या जमिनीस तो [१][निर्मूलन आदेश] लागू होत असेल अशा जमिनीच्या मालकास, सक्षम प्राधिकरणाने मान्य केलेल्या नकाशानुसार आणि त्या प्राधिकरणास जे निर्बंध आणि शर्ती लादणे योग्य वाटेल असे निर्बंध व शर्ती (ज्या वेळेच्या आत पुनर्विकास पूर्ण झाला पाहिजे त्या वेळेसंबंधीची शर्त धरून) कोणत्याही असल्यास, त्यास अधीन राहून, जमिनीचा, पुनर्विकास करता येईल:

परंतु, जो मालक त्याच्या जमिनीच्या उपयोगावर अशा रीतीने लादलेल्या निर्बंधामुळे किंवा शर्तीमुळे, किंवा असा कोणताही निर्बंध किंवा शर्त रद्द करण्यास किंवा त्यात फेरबदल करण्यास सक्षम प्राधिकरणाने नंतर नकार दिल्यामुळे, पीडित झालेला असेल त्यास, विहित करण्यात येईल अशा मुदतीच्या आत, न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(११) कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (१०) अन्वये मान्य केलेल्या नकाशाचे किंवा लादलेल्या निर्बंधाचे किंवा शर्तीचे उल्लंघन करून, कोणत्याही बांधकामास, प्रारंभ करता किंवा असा प्रारंभ करविता कामा नये.

**निर्मूलन क्षेत्राचा पुनर्विकास करण्याचा सक्षम प्राधिकरणाचा अधिकार.**

**१३.** (१) कलम १२, पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम प्राधिकरणास निर्मूलन आदेशानुसार इमारती पाडून ती जमीन मोकळी केल्यानंतर कोणत्याही वेळी परंतु, मालकाने त्या जमिनीच्या पुनर्विकासाच्या कामास प्रारंभ करण्यापूर्वी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे याबद्दल त्या प्राधिकरणाची खात्री झाली असेल तर, आदेशाद्वारे, त्या जमिनीचा स्वतःच्या खर्चाने पुनर्विकास करण्याचा निर्णय घेता येईल.

(२) निर्मूलन आदेशानुसार इमारती पाडून टाकून जमीन मोकळी करण्यात आली असेल त्या बाबतीत, सक्षम प्राधिकाऱ्याची अशी खात्री झाली असेल की, कलम १२, पोट-कलम (१०) अन्वये यथोचितरीत्या मान्य केलेल्या आराखडयाचे किंवा लादलेल्या निर्बंधाचे किंवा शर्तीचे उल्लंघन करून जमिनीच्या मालकाने, तिचा पुनर्विकास केलेला आहे किंवा तो पुनर्विकास करीत आहे किंवा अशा शर्ती अन्वये कोणतीही मुदत विनिर्दिष्ट केलेली असल्यास, त्या मुदतीच्या आत तिचा पुनर्विकास करण्यात आलेला नाही, तर त्यास आदेशाद्वारे, स्वतःच्या खर्चाने जमिनीचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेता येईल.

परंतु, असा आदेश काढण्यापूर्वी, असा आदेश का काढण्यात येऊ नये याबाबतचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी मालकाला देण्यात येईल.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २(१) द्वारे "आदेश" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

प्रकरण पाच

## भूमि संपादन

**भूमि संपादन करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

**१४.** (१) सक्षम प्राधिकरणाने केलेल्या कोणत्याही अभिवेदनावरून राज्य शासनास असे दिसून येईल की, [१][कोणत्याही झोपडपट्टीच्या अथवा अशा वस्तीतील कोणत्याही इमारतीच्या संबंधातील कोणत्याही सुधार कामाचे कार्यान्वयन करणे किंवा] कोणत्याही निर्मूलन क्षेत्राचा पुर्नविकास करणे त्या प्राधिकरणास शक्य व्हावे म्हणून, अशा कोणत्याही क्षेत्रातील त्यालगतची किंवा त्याने वेढलेली कोणतीही भूमि संपादन करणे आवश्यक आहे तर, राज्य शासनाने या कलमानुसार ती भूमि संपादन करण्याचे ठरविले आहे अशा आशयाची नोटीस **राजपत्रात** प्रसिद्ध करून राज्य शासनास उक्त भूमि संपादित करता येईल :

[२][परंतु, अशी नोटीस प्रसिद्ध करण्यापूर्वी, राज्य शासनास, किंवा, यथास्थिति, जिल्हाधिकाऱ्यास अशा जमिनीच्या मालकाला किंवा राज्य शासनाच्या किंवा, यथास्थिति, जिल्हाधिकाऱ्यांच्या मते अशा जमिनीत हितसंबंध असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीस, ती जमीन का संपादित करण्यात येऊ नये, याबाबतची कारणे दाखविण्यास फर्माविता येईल आणि जिल्हाधिकारी सर्व वाजवी कागदपत्रांसह, अशा प्रकारे सादर करण्यात आलेले कोणतेही आक्षेप व त्यावरील आपला अहवाल राज्य शासनाकडे पाठवील आणि हा अहवाल व असल्यास, त्याबाबतीतील आक्षेप विचारात घेतल्यानंतर राज्य शासनास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.]

[३][(१अ) पोट-कलम (१) मध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी भूमि संपादन करणे म्हणजे सार्वजनिक प्रयोजन असल्याचे मानण्यात येईल.]

(२) पूर्वोक्तप्रमाणे एखादी नोटीस **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आली असेल तेव्हा, ती भूमि, अशा रीतीने नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेस आणि त्या तारखेपासून, सर्व भारांपासून मुक्त राज्य शासनाकडे पूर्णपणे निहित होईल.

[६]**[जमिनीचा कब्जा असलेल्या व्यक्तीला तिचा कब्जा जिल्हाधिकाऱ्याकडे परत करणे किंवा देणे इत्यादी याबाबत फर्माविण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.]**

**१५.** [४][(१) कलम १४, पोट-कलम (२) अन्वये राज्य शासनाकडे कोणतीही जमीन निहित असेल त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यास, जमिनीचा कब्जा जिच्याकडे असेल अशा कोणत्याही व्यक्तीला नोटीस बजावण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, अशा जमिनीचा कब्जा त्याच्याकडे किंवा त्याने याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे, परत करण्यासंबंधात किंवा स्वाधीन करण्यासंबंधात, लेखी नोटिशीद्वारे आदेश देता येईल.]

(२) कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) खालील आदेशाचे पालन करण्यात कसूर करील किंवा त्यास नकार देईल तर, [५][जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीस] जमिनीचा कब्जा घेता येईल आणि त्या प्रयोजनार्थ, वाजवीरीत्या आवश्यक असेल अशा बळाचा वापर करता येईल.

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १०२, अनुसूची दोन द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३ द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १०२, अनुसूची दोन अन्वये पोट-कलम (१अ) नेहमीच समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात आले आहे.

[४] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ४(अ) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४(ड) द्वारे मूळ समास टीपऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

[1][(३) पूर्वोक्तप्रमाणे कोणत्याही जमिनीचा कब्जा घेण्यात आला असेल त्याबाबतीत जिल्हाधिकारी, ती जमीन सक्षम प्राधिकरणास उपलब्ध करून देईल आणि त्यानंतर असा सक्षम प्राधिकरणास—

(अ) बांधकाम पाडून टाकण्यासंबंधीच्या किंवा त्यात सुधारणा करण्यासंबंधीच्या किंवा त्याच्या पुनर्विकासासंबंधीच्या आदेशाची अंमलबजावणी स्वत:च करता येईल ; किंवा

(ब) कलम १०-अ च्या तरतुदींनुसार त्या कलमात निर्दिष्ट केलेले सुधारणेसंबंधातील किंवा इतर काम, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ अन्वये रचना करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण किंवा अशा जमिनीच्या भोगवटादारांची सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा कलम ४ अन्वये जे निर्मूलन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असेल अशा कोणत्याही इतर क्षेत्राचे भोगवटादार यांसह, कोणत्याही इतर अभिकरणाच्या स्वाधीन करता येईल.

१९७७ चा महा. २८.

(४) राज्य शासनाला किंवा राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने जिल्हाधिकाऱ्याला, या अधिनियमाची प्रयोजने साध्य करण्यासाठी राज्य शासनाला इष्ट वाटतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीन राहून, अशा जमिनीवर पार पाडण्यात आलेली सुधारविषयक व इतर कामे यांसह किंवा त्यांच्याशिवाय, ती अशा, भोगवटादाराच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांकडे, भाडेपट्टा करून हस्तांतरित करता येतील.]

**भरपाई मिळण्याचा हक्क.**

**१६.** या अधिनियमान्वये संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीत कोणताही हितसंबंध असलेल्या प्रत्येक व्यक्तीस, या अधिनियमात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे, राज्य शासनाकडून भरपाई मिळण्याचा हक्क असेल.

**भरपाई ठरविण्यासाठी मूलतत्त्वे.**

**१७.** (१) या प्रकरणान्वये कोणतीही भूमि संपादन करण्यात आली असेल आणि ती राज्य शासनाकडे निहित करण्यात आली असेल त्याबाबतीत, अशा संपादनाबद्दल भरपाईची जी रक्कम या कलमाच्या तरतुदीनुसार ठरविण्यात येईल ती, राज्य शासन देईल.

(२) अशा भरपाईची रक्कम [2][राज्य शासन किंवा, यथास्थिति, जिल्हाधिकारी] व जिला भरपाई देण्यात यावयाची असेल अशी व्यक्ती यांच्यामध्ये कराराद्वारे ठरविण्यात आली असेल त्याबाबतीत, ती, अशा करारास अनुसरून ठरविण्यात येईल.

(३) असा करार होऊ शकत नसेल त्याबाबतीत, संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीच्यासंबंधात भरपाई म्हणून देय असलेली रक्कम ही, कलम १४ मध्ये उल्लेखिलेली नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या लागोपाठच्या पाच वर्षांच्या मुदतीत, अशा जमिनीपासून प्रत्यक्ष मिळालेल्या निव्वळ सरासरी मासिक उत्पन्नाच्या साठ पटींइतकी असेल.

(४) पोट-कलम (३) मध्ये उल्लेखिलेले निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न हे, पहिल्या अनुसूचीत ठरविण्यात आलेल्या रीतीने व तत्त्वांनुसार मोजण्यात येईल.

(५) सक्षम प्राधिकरण, विहित रीतीने चौकशी केल्यानंतर, जमिनीपासून प्रत्यक्ष मिळालेले निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न पोट-कलम (४) च्या तरतुदीस अनुसरून ठरवील आणि त्या जमिनीवरील ठळक जागी नोटीस प्रदर्शित करील आणि कलम ३६ मध्ये तरतूद करण्यात आलेल्या रीतीने ती बजावील व त्याद्वारे, जमिनीच्या मालकास आणि तिच्यात हितसंबंधी असलेल्या प्रत्येक व्यक्तीस, अशा रीतीने ठरविण्यात आलेली रक्कम मान्य आहे किंवा कसे आणि ती मान्य नसल्यास, त्या जमिनीपासून प्रत्यक्ष मिळालेले निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न म्हणून ती कोणत्या रकमेची मागणी करते आहे, याबद्दल

[1] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ४ (अ) द्वारे पोट-कलम (३) ऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे “राज्य शासन” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी, आपल्याला कळविण्याबद्दल अशा मालकाला किंवा व्यक्तीला फर्मावील.

(६) पोट-कलम (५) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने ठरविलेल्या निव्वळ सरासरी मासिक उत्पन्नाची रक्कम जी कोणतीही व्यक्ती मान्य करीत नसेल आणि त्या रकमेहून अधिक रकमेची मागणी करीत असेल तिला, त्या पोट-कलमामध्ये उल्लेखिलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल.

(७) अपील करण्यात आल्यावर, अपीलकर्त्याचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, न्यायाधिकरण निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न निश्‍चित करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयात त्यावर हरकत घेता येणार नाही.

(८) ज्या जमिनीच्या संबंधात निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न ठरविण्यात आले असेल त्या जमिनीवर एखादी इमारत असेल त्याबाबतीत, अशा इमारतीसंबंधात कोणतीही वेगळी भरपाई देण्यात येणार नाही :

परंतु, जमिनीचा मालक व अशा जमिनीवरील इमारतीचा मालक वेगवेगळा असेल त्याबाबतीत सक्षम प्राधिकरण ती भरपाईची रक्कम संपादनाच्या तारखेस, जमिनीच्या बाजार मूल्याचे इमारतीच्या बाजार मूल्याशी जे प्रमाण असेल त्याच प्रमाणात जमिनीचा व इमारतीचा मालक यांच्यामध्ये विभागून देईल.

**भरपाईचे संविभाजन.**

**१८.** (१) कलम १७ अन्वये निश्‍चित करण्यात आलेल्या भरपाईच्या रकमेमध्ये हितसंबंध असल्याचा अनेक व्यक्ती दावा करतील त्याबाबतीत सक्षम प्राधिकरण, त्याच्या मते भरपाई मिळण्याचा ज्यांना हक्क असेल अशा व्यक्ती व त्यांना प्रत्येकी देय असलेली रक्कम निश्‍चित करील.

(२) भरपाईचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे, संविभाजन किंवा उक्त भरपाईची रक्कम किंवा तिचा कोणताही भाग देय असणाऱ्या व्यक्ती यासंबंधी कोणताही वाद निर्माण होईल तर सक्षम प्राधिकाऱ्यास तो वाद, न्यायाधिकरणाच्या निर्णयासाठी पाठविता येईल आणि कोणत्याही अशा वादाचा निर्णय करताना न्यायाधिकरण भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या भाग तीनच्या तरतुदीचे अनुसरण करील ; १८९४ चा १.
[१][व न्यायाधिकरणाचा विवादावरील निर्णय हा अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे त्यावर हरकत घेण्यात येणार नाही.]

**भरपाई देणे किंवा ती न्यायालयात जमा करणे.**

**१९.** (१) भरपाईची रक्कम ठरविल्यानंतर सक्षम प्राधिकरण, राज्य शासनाच्यावतीने भरपाईची रक्कम ती मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तींना देऊ करील व देईल.

(२) भरपाईची रक्कम मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्ती, ती घेण्यास कबूल झाल्या नाहीत, किंवा भरपाईची रक्कम मिळण्यासंबंधीच्या हक्काबाबत किंवा तिच्या संविभाजानाबाबत, कोणताही वाद निर्माण झाल्यास, सक्षम प्राधिकरण, बृहन्मुंबईत मुंबई शहर दिवाणी न्यायालयात आणि अन्यत्र, जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयात, भरपाईची रक्कम जमा करील आणि ते न्यायालय, भूमि संपादन अधिनियम, १८९४ याची कलमे ३२ व ३३ मध्ये घालून दिलेल्या रीतीनुसार, अशा रीतीने जमा केलेल्या रकमेची व्यवस्था लावील. १८९४ चा १.

**भरपाईची रक्कम इत्यादी ठरविण्याचे सक्षम प्राधिकरणाचे अधकिर.**

**२०.** (१) सक्षम प्राधिकरणास, आदेश काढून, भरपाईची रक्कम निश्‍चित करण्याच्या किंवा तिच्या संविभाजनाच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही व्यक्तीस, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी, तिच्या ताब्यात असलेली, संबद्ध माहिती पुरविण्याबद्दल, फर्मावता येईल.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ४ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

१९०८ चा ५. (२) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खालील दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयास जे अधिकार असतात ते सर्व अधिकार, कलम १७ अन्वये चौकशी करीत असताना, सक्षम प्राधिकरणास, पुढील बाबींच्या संबंधात असतील :—

(अ) कोणत्याही व्यक्तीवर समन्स काढणे व तिला उपस्थित राहण्सास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ब) कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व सादर करण्यास भाग पाडणे;

(क) शपथेवर पुरावा स्वीकारणे;

(ड) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणतेही सरकारी अभिलेख मागविणे;

(ई) साक्षीदाराची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र देणे.

**२१.** जमिनीचा कब्जा घेतल्यावर किंवा त्यापूर्वी भरपाईची रक्कम देण्यात किंवा ठेव म्हणून ठेवण्यात **व्याज देणे.** आली नसेल तेव्हा, सक्षम प्राधिकरण अशा रीतीने कब्जा घेतल्याच्या वेळेपासून उक्त रक्कम देण्यात किंवा ठेव म्हणून ठेवण्यास येईपर्यंतच्या मुदतीसाठी, राज्य शासन आदेशाद्वारे निश्चित करील अशा दराच्या व्याजासह (असा दर दरसाल दरशेकडा ४ पेक्षा कमी असणार नाही) ठरविण्यात आलेली भरपाईची रक्कम, राज्य शासनाच्यावतीने देईल.

## प्रकरण सहा

## [१][झोपडपट्टीतील भोगवटादारांचे निष्कासनापासून व अटकावणी अधिपत्रापासून संरक्षण]

**सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय भोगवटादाराच्या निष्कासनासाठी [१][किंवा अटकावणी अधिपत्र काढण्यासाठी] कार्यवाही न करणे.**

**२२.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, सक्षम प्राधिकरणाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, कोणत्याही व्यक्तीने,—

(अ) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ याच्या प्रारंभानंतर, [२][झोपडपट्टीतील] कोणत्याही इमारतीतील किंवा जमिनिवरील भोगवटादारांच्या निष्कासनासाठी [२][अथवा अशा कोणत्याही भोगवटादाराकडून भाड्याच्या किंवा भरपाईच्या कोणत्याही थकबाकीची वसुली करण्यासाठी अथवा दोन्हीसाठी] कोणताही हुकूमनामा किंवा आदेश मिळविण्यासाठी, कोणताही दावा किंवा कार्यवाही करता कामा नये; [२][किंवा] १९७१ चा महा. २८

(ब) अशा प्रारंभापूर्वी अशा वस्तीतील कोणत्याही इमारतीतील किंवा जमिनीवरील भोगवटादारांच्या निष्कासनासाठी [३][अथवा अशा भोगवटदारांकडून भाड्याच्या किंवा भरपाईच्या कोणत्याही थकबाकीची वसुली करण्यासाठी अथवा दोन्हीसाठी] दाखल केलेल्या कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत कोणताही हुकूमनामा किंवा आदेश मिळवला असेल त्याबाबतीत, अशा हुकूमनाम्याची [४][किंवा आदेशाची] बजावणी करता कामा नये; [५][किंवा ]

[६][(क) एखाद्या झोपडपट्टीतील जागांच्या किंवा घराच्या कोणत्याही भोगवटादाराविरुद्ध भाड्याच्या थकबाकीबद्दल अटकावणी अधिपत्रासाठी कोणत्याही न्यायाधीशांकडे किंवा इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८२ हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, त्याच्या प्रकरण आठ खालील लघुवाद न्यायालयाच्या प्रबंधकाकडे किंवा प्रांतिक लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८७ हा महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, त्याच्या प्रकरण चार-अ खालील कोणत्याही लघुवाद न्यायालयाकडे अर्ज करता कामा नये.] १८८२ चा १५. १८८७ चा ९.

[७][(१-अ) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम, १९८६ (या कलमात यानंतर ज्याचा “सुधारणा अधिनियम” असा निर्देश करण्यात आला आहे) यांच्या प्रारंभापूर्वी अंमलात असलेल्या पोट-कलम (१) मध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या १९८७ चा महा. २.

---

[१] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ५ द्वारे प्रकरण सहाच्या “ झोपडपट्टीतील भाडेकरूंचे निष्कासनापासून संरक्षण ” या मूळ शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[२] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ (अ)(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ (अ)(दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६ (१)(अ) द्वारे “ बजावणी करता कामा नये ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमच्या कलम ६(५) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमच्या कलम ६(१)(ब) द्वारे खंड (ग) जादा दाखल करण्यात आला.

[७] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम २ (ब) द्वारे पोट-कलम (१अ) समाविष्ट करण्यात आले.

इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सक्षम प्राधिकारणाची लेखी पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस,—

(अ) दिनांक ३० सप्टेंबर १९८५ पासून [महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० याच्या मुदत समाप्तीचा दिनांक असलेल्या] सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत दाखल केलेल्या, कोणत्याही, खटल्यात किंवा कार्यवाहीत, झोपडपट्टीतील [जे क्षेत्र यापूर्वी, महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (अनधिकृत भोगवट्यास मनाई व तडकाफडकी काढून टाकण्याबाबत) अधिनियम, १९७५ याचे कलम (२), खंड (फ) मधील "रिकाम्या जमिनी" च्या व्याख्येच्या कक्षेत येत असल्याचे गृहीत धरले जात होते] कोणत्याही इमारतीतून किंवा जमिनीतून कोणत्याही भोगवटादारास काढून टाकण्यासाठी किंवा अशा भोगवटादाराकडून भाड्याची किंवा नुकसानभरपाईची थकबाकी वसूल करण्यासाठी, किंवा दोन्हीसाठी, मिळवलेला कोणताही हुकूमनामा किंवा आदेश अंमलात आणता येणार नाही; किंवा

१९८० चा महा. १६.

१९७५ चा महा. ६६.

(ब) इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यातील प्रकरण आठ अन्वये, लघुवाद न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाकडे किंवा प्रबंधकाकडे, किंवा प्रांतीय लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८७ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यातील प्रकरण चार-अ अन्वये कोणत्याही लघुवाद न्यायालयाकडे अशा कोणत्याही झोपडपट्टीतील घराच्या जागेच्या अशा कोणत्याही भोगवटादाराविरुद्ध भाड्याच्या थकबाकीसाठी अटकावणी अधिपत्र काढण्यासाठी अर्ज करता येणार नाही.]

१८८२ चा १५.

१८८७ चा ९.

(२) पोट-कलम (१) [1][किंवा (१अ)] मध्ये निर्दिष्ट केलेली परवानगी मिळविण्याची इच्छा असलेली प्रत्येक व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा तपशिलासह, सक्षम प्राधिकरणाकडे लेखी अर्ज करील.

(३) असा अर्ज मिळाल्यावर, सक्षम प्राधिकरण, पक्षकारास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यावर, आणि त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, प्रकरणाच्या परिस्थितीबाबत संक्षिप्त चौकशी केल्यावर, लेखी आदेशाद्वारे, एकतर अशी परवानगी देईल किंवा ती देण्याचे नाकारील.

(४) [2][पोट-कलम (१) च्या खंड (अ) किंवा (ब) अन्वये] [3][किंवा पोट-कलम (१अ) च्या खंड (अ) अन्वये] परवानगी देताना किंवा ती देण्याचे नाकारताना, सक्षम प्राधिकरणा पुढील गोष्टी विचारात घेईल :—

(अ) भोगवटादाराला जर निष्कासित करण्यात आले तर त्यास परवडेल अशी पर्यायी जागा त्याला मिळू शकेल किंवा कसे ;

(ब) झोपडपट्टीच्या सुधारणेच्या किंवा निर्मूलनाच्या हिताच्या दृष्टीने निष्कासन करण्यात येत आहे किंवा कसे ;

[4][(ब-१) प्रत्येक प्रकरणाची संबंधित परिस्थिती, भाड्याच्या किंवा भरपाईच्या थकबाकीची एकूण रक्कम आणि ज्या कालावधीसाठी ती देय आहे तो कालावधी आणि ती रक्कम देण्याची भोगवटादाराची

---

[1] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ (क) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(२) द्वारे " पोट-कलम (३) अन्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २(ड) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २ (ड) (दोन) द्वारे खंड (ब-१) समाविष्ट करण्यात आला.

क्षमता लक्षात घेऊन ठरलेल्या मुदतीच्या आत भाड्याच्या किंवा भरपाईच्या थकबाकीची संपूर्ण रक्कम वाजवी हप्त्यांनी भरण्यास भोगवटादार तयार आणि इच्छुक आहे किंवा कसे ;]

(क) विहित करण्यात येतील अशा, कोणत्याही असल्यास, इतर बाबी.

[1][(४-अ) (अ) पोट-कलम (१) चा खंड (क) [2][किंवा पोट-कलम (१अ) चा खंड (ब) याखालील कोणतीही परवानगी देताना किंवा देण्यास नकार देताना सक्षम प्राधिकरण पुढील गोष्टी विचारात घेईलः

(एक) भाड्याची रक्कम किती आहे आणि ती किती कालावधीसाठी देय आहे ;

(दोन) भाड्याची थकबाकी भरण्यास पात्र असलेल्या भोगवटादारास इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८२ याच्या कलम ५३, पोट-कलम (१) मधील परंतुकात किंवा यथास्थिति, प्रांतिक लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८७ याच्या कलम २७-ब, पोट-कलम (१) च्या परंतुकात नमूद केलेली मागणीची रीतसर नोटीस दिली आहे किंवा कसे ; १८८२ चा १५. १८८७ चा ९.

(तीन) भोगवटादार करारनिविष्ट मुदतीत शिल्लक रक्कम भरण्यास तयार आहे किंवा कसे;

(चार) विहित करण्यात येतील अशा, कोणत्याही असल्यास, इतर बाबी.]

(ब) जर, पोट-कलम (१) खंड (क) [4][किंवा पोट-कलम (१अ) चा खंड (ब)]खाली परवानगीसाठी केलेला कोणताही अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून [[3][सहा महिन्यांच्या] मुदतीत सक्षम प्राधिकरणाने परवानगी देण्याचे नाकारले नाही तर अशी मुदत संपल्यानंतर परवानगी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.]

(५) सक्षम प्राधिकरण, [5][पोट-कलम (१) [6][किंवा (१अ)] च्या कोणत्याही खंडान्वये] परवानगी देण्याचे नाकारील त्याबाबतीत, अशा नकाराबाबतच्या कारणांचे संक्षिप्त निवेदन नमूद करील आणि अर्जदाराला त्याची एक प्रत पुरवील.

**अपील.** **२३.** [7][कलम २२ चे पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (१अ)] मध्ये निर्दिष्ट केलेली परवानगी देण्यास नकार देणाऱ्या सक्षम प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे पीडित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, न्यायधिकरणाकडे अपील करता येईल आणि न्यायधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

**दंडनीय धाकदपटशा दाखवून भाडे, इत्यादीची वसुली करण्यास मनाई.** [8][**२३अ.** (१) कोणत्याही व्यक्तीने —

(अ) कलम २२ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही भोगवटादाराकडून त्याच्या शरीरास, लौकिकास किंवा मालमत्तेस अगर त्या भोगवटादाराचा जिच्यामध्ये हितसंबंध असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या शरीरास किंवा तिच्या लौकिकास क्षती पोचवण्याचा धाक दाखवून किंवा तशी क्षती पोचवून

---

[1] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(३) द्वारे पोट-कलम (४अ) समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ कलम २(इ) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २(इ) (दोन) (अ) द्वारे मूळ मजुकाराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २ (इ) (दोन) (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ६(४) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २(फ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये " निकट पूर्ववर्ती कलमाचे पोट-कलम (१) मध्ये " या मजुकाराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये कलम २३ अ समाविष्ट करण्यात आले.

कोणतेही भाडे, भरपाई किंवा इतर आकार वसूल करता कामा नये किंवा वसूल करण्याचा प्रयत्न करता कामा नये.

(ब) अशा कोणत्याही भोगवटादारास कायदेशीर कार्यपद्धतीचा अवलंब केल्याशिवाय बळजबरीने निष्कासित करता कामा नये किंवा निष्कासित करण्याचा प्रयत्न करता कामा नये; किंवा

(क) कोणत्याही उपरोक्त कृतीस किंवा गोष्टींस कोणत्याही रीतीने अपप्रेरणा देता कामा नये.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, दोषसिद्धीनंतर तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.]

**भाडेकरूस त्याने रिकाम्या केलेल्या विहित जागांचा कब्जा परत मिळणे.**

**२४.** (१) झोपडपट्टीतील कोणतीही इमारत भोगवट्यात असलेला भाडेकरू ती इमारत पुन्हा बांधण्यासाठी आवश्यक आहे या कारणावरून उक्त इमारत रिकामी करून देईल किंवा त्यास तीमधून निष्कासित करण्यात येईल त्याबाबतीत, भाडेकरूस, उक्त इमारत पुन्हा बांधण्यात आल्यानंतर इमारतीचा भोगवटा पुन्हा मिळण्याची त्याची इच्छा असल्याबद्दलचे प्रतिज्ञापन, विहित करण्यात येईल अशा मुदतीत, सक्षम प्राधिकरणाकडे सादर करता येईल.

(२) असे प्रतिज्ञापन मिळाल्यावर, सक्षम प्राधिकरण, आदेशाद्वारे, इमारतीच्या मालकास, पुन्हा उभारण्यात आलेल्या इमारतीचे नकाशे आणि तिच्या खर्चाचा अंदाज आणि आवश्यक असेल असा इतर तपशील, विहित करण्यात येईल अशा मुदतीत सादर करण्यास फर्मावील आणि असे सादर केलेले नकाशे व अंदाज आणि तपशील, कोणताही असल्यास, त्यांच्या आधारे आणि कलम २५ पोट-कलम (३) च्या तरतुदी विचारात घेऊन, आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, तो, पोट-कलम (१) अन्वये भाडेकरूने केलेल्या प्रतिज्ञापनास अनुसरून, जर त्याला इमारतीचा भोगवटा पुन्हा देण्यात आला तर त्या भाडेकरूकडून देय होणारे भाडे तात्पुरते निश्चित करील.

(३) पोट-कलम (२) अन्वये तात्पुरते निश्चित केलेले भाडे, विहित केलेल्या रीतीने भाडेकरूस आणि मालकास कळविण्यात येईल.

(४) अशा रीतीने कळविण्यात आल्यानंतर, भाडेकरूस, पोट-कलम (१) अन्वये त्याने केलेल्या प्रतिज्ञापनास अनुसरून इमारतीचा भोगवटा त्यास पुन्हा देण्यात आला तर, तो, कलम २५ अन्वये अंतिमरीत्या भाडे निश्चित करण्यात येईपर्यंत मालकास, पोट-कलम (२) अन्वये तात्पुरते निश्चित केलेले भाडे देईल असे, विहित करण्यात येईल अशा मुदतीत, सक्षम प्राधिकरणास, लेखी कळवील नंतर, सक्षम प्राधिकरण इमारतीची पुन्हा बांधणी करण्यात आल्यानंतर भाडेकरूला तिचा भोगवटा देण्याबद्दल मालकास निदेश देईल [आणि अशा पुनर्बांधणीची सूचना, पोट-कलम (५) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने देण्यात येईल.] आणि मालकास अशा निदेशाचे पालन करणे बंधनकारक असेल.

(५) इमारत पुन्हा बांधण्याचे काम पूर्ण होत आले असेल किंवा पूर्ण झाले असेल त्यानंतर लगेच सक्षम प्राधिकरण संबंधित भाडेकरूस नोटीस देईल. उक्त नोटीस इमारतीच्या ठळक जागी लावून आणि कोणत्याही भाडेकरूंनी सक्षम प्राधिकरणाकडे ज्याची नोंद केली असेल अशा पत्त्यावर डाकेने पाठवून आणि सक्षम प्राधिकरणाने ठरविले असेल अशा अन्य रीतीने देण्यात येईल, अशा नोटिशीत, विनिर्दिष्ट तारखेपासून इमारत भोगवट्यासाठी तयार होईल किंवा तयार आहे आणि अशा रीतीने पुन्हा बांधलेल्या इमारतीचा, अशा तारखेपासून एक महिन्याच्या आत भाडेकरूंनी भोगवटा केला पाहिजे, असे सांगण्यात येईल. विनिर्दिष्ट तारखेपासून एक महिन्याच्या आत इमारतीचा भोगवटा करण्यात भाडेकरू कसूर करील तर, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही करारात किंवा कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, त्याची भाडेदारी किंवा उक्त इमारतीसंबंधातील इतर अधिकार संपुष्टात आल्याचे समजण्यात येईल;

आणि मालकास त्याचा कब्जा मिळण्याचा अधिकार असेल. सक्षम प्राधिकरणाने तरतूद केलेली तात्पुरती जागा अशा भाडेकरूने स्वीकारली असेल तर त्यास ती ताबडतोब रिकामी करावी लागेल; आणि त्याने ती रिकामी केली नाही तर तो कलम ३३ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, तीमधून निष्कासित केला जाण्यास पात्र ठरेल.

**झोपडपट्टी-क्षेत्रांतील इमारतीचे भाडे.**

**२५.** (१) झोपडपट्टीतील कोणतीही इमारत पुन्हा बांधण्यात आल्यानंतर ती भाडेकरूस भाड्याने देण्यात येईल त्याबाबतीत, इमारतीचे भाडे या कलमाच्या तरतुदींनुसार निश्चित करण्यात येईल.

(२) अशी कोणतीही इमारत [कलम २४, पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या निदेशास अनुसरून ज्याला इमारतीचा कब्जा देण्यात आला असेल अशा भाडेकरूखेरीज इतर] भाडेकरूस भाड्याने देण्यात आली असेल त्याबाबतीत, उक्त भाडेकरू,—

(अ) उक्त इमारत ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रात, भाडे नियंत्रणविषयक सर्वसाधारण कायदा अंमलात असेल व तो उक्त इमारतीस लागू असेल तर उक्त कायद्याच्या तरतुदीनुसार निश्चित केलेल भाडे;

(ब) अशा क्षेत्रात असा कोणताही कायदा अंमलात नसेल तर, मालक आणि भाडेकरू यांमध्ये कबूल करण्यात येईल असे भाडे, मालकास देण्यास पात्र ठरेल.

(३) कलम २४, पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या निदेशास अनुसरून अशी कोणतीही इमारत भाडेकरूस भाड्याने देण्यात येईल त्याबाबतीत, भाडे नियंत्रणविषयक कोणत्याही कायद्यान्वये मालकाने अधिक दराने प्रमाण भाडे निश्चित करून घेतलेले नसेल तर इमारत पुन्हा बांधण्याच्या एकूण खर्चाच्या व ज्या जमिनीवर इमारत पुन्हा बांधण्यात आली त्या जमिनीच्या किंमतीच्या चार टक्के एवढ्या रकमेइतके वार्षिक भाडे मालकास देण्यास भाडेकरू पात्र ठरेल. प्रत्येक वर्षाचे प्रमाण भाडे हे पूर्वोक्त वार्षिक भाड्यापेक्षा अधिक निश्चित करण्यात आले असेल तर, याबाबतीत केलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, फरकाची अशी रक्कम, राज्य शासन, अर्थसहाय्यित भाड्याच्या रूपाने मालकास देईल.

**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, कलम १४ अन्वये जमिनीचे संपादन करण्यात आले असेल तर त्या जमिनीच्या संबंधात जी भरपाई देय झाली असती त्या रकमेएवढी रक्कम ही, इमारत पुन्हा बांधण्याच्या कामाचा प्रारंभ करण्यात आला त्या तारखेस जमिनीची किंमत म्हणून समजण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये कोणत्याही इमारतीच्या बाबतीत भाडेकरुकडून देय असलेले भाडे, भाडेकरूने किंवा मालकाने अर्ज केल्यावर, पोट-कलम (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल :

परंतु, असे भाडे निश्चित करण्याबद्दल मालकाकडून किंवा भाडेकऱ्याकडून करण्यात आलेला अर्ज, पुरेशा कारणावरून असेल त्याखेरीज, इमारतीची पुन्हा बांधणी झाल्याच्या तारखेपासून नव्वद दिवस संपल्यानंतर अशा प्राधिकरणाकडून दाखल करून घेतला जाणार नाही.

(५) पोट-कलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेला अर्ज ज्या प्राधिकरणाकडे करण्यात येईल ते प्राधिकरण पुढीलप्रमाणे असेल,—

(अ) ती इमारत जेथे असेल त्या क्षेत्रात, भाडे नियंत्रणविषयक सर्वसाधारण कायदा अंमलात असेल त्याबाबतीत, त्या क्षेत्रात असलेल्या इमारतींचे भाडे निश्चित करण्यासाठी ज्याच्याकडे अर्ज करता येतील ते प्राधिकरण, आणि त्या कलमान्वये भाडे ठरविण्याच्या प्रयोजनासाठी, त्या प्राधिकरणास अशा सर्वसाधारण कायद्यान्वये जे अधिकार असतील त्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करता येईल आणि अपिलासंबंधीच्या तरतुदी धरून अशा कायद्याच्या तरतुदी तद्नुसार लागू होतील.

(ब) उक्त क्षेत्रात असा कोणताही कायदा अंमलात नसेल तर, राज्य शासनाकडून या बाबतीत करण्यात आलेल्या नियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल असे प्राधिकरण, आणि अशा नियमांमध्ये, भाडे निश्चित करताना उक्त प्राधिकरणाकडून जी कार्यपद्धती अनुसरण्यात येईल ती कार्यपद्धती, [३][अशा प्राधिकरणाच्या निर्णयाविरुद्धची अपिले व तसेच, असे अर्ज व अपिले करण्यासंबंधातील न्यायालयीन फी वसूल करणे ] यासंबंधी तरतूद करण्यात येईल.

(६) या कलमान्वये भाडे अंतिमरीत्या निश्चित करण्यात येईल त्याबाबतीत वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे तात्पुरत्या निश्चित करण्यात आलेल्या आणि भाडेकरूने दिलेल्या भाड्याची रक्कम अशा रीतीने अंतिमरीत्या निश्चित केलेल्या भाड्याच्या रकमेबरोबर समायोजित करण्यात येईल; आणि अशी दिलेली रक्कम अंतिमरीत्या निश्चित केलेल्या भाड्याच्या रकमेपेक्षा कमी किंवा अधिक होईल तर भाडेकरू कमी पडलेली रक्कम देईल किंवा, यथास्थिति, त्याला परतावा मिळण्याचा हक्क असेल.

**विवक्षित इमारतींमधून भाडेकरूंना निष्कासित करण्यास हे प्रकरण लागू नसणे.**

१९३६ चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधि. ३६.

**२६.** सरकारच्या, नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम, १९३६ अन्वये प्रस्थापित केलेल्या नागपूर सुधार प्रन्यासाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या, झोपडपट्टीतील कोणत्याही इमारतीमधून भोडकरूस, कोणत्याही कायद्याअन्वये निष्कासित करण्यास किंवा त्यासंबंधात या प्रकरणातील कोणताही मजकूर लागू होणार नाही.

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम २ द्वारे “ व तसेच अशा प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्धची अपिले ” या मजुकराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

प्रकरण सात

## संकीर्ण

**प्रवेश करण्याचे अधिकार.**

**२७.** या बाबतीत सक्षम प्राधिकरणाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सहायक अथवा श्रमिक यांच्यासह किंवा त्यांच्याशिवाय, कोणतीही चौकशी, तपासणी, मोजणी, मूल्यांकन किंवा सर्वेक्षण करण्यासाठी अथवा या अधिनियमान्वये किंवा, तद्न्वये प्राधिकृत केलेले, किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखालील कोणतीही नोटीस, नियम किंवा आदेश यांच्या कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा त्यास अनुसरून जे करणे आवश्यक असेल असे कोणतेही काम करण्यासाठी कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीत किंवा तीवर प्रवेश करणे कायदेशीर असेल.

**तपासणी करण्याचे अधिकार.**

**२८.** (१) सक्षम प्राधिकरणास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे,—

(अ) या अधिनियमाच्या तरतुदी ज्या कोणत्याही इमारतीस किंवा जमिनीस लागू होतील त्या इमारतीतील किंवा जमिनीतील किंवा तीवरील कोणतीही जलनिकास व्यवस्था, शौचकूप, मूत्री, मलकुंडी, नळ, मलप्रणाल किंवा जलमार्ग यांची तपासणी करण्यासाठी, आणि त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशी जलनिकास व्यवस्था, शौचकूप, मूत्री, मलकुंडी, नळ, मलप्रणाल किंवा यथास्थिति, जलमार्ग यांच्यापासून होणाऱ्या कोणत्याही उपद्रवास प्रतिबंध करण्यासाठी किंवा तो दूर करण्यासाठी जमीन खोदवून घेण्यासाठी;

(ब) पातळी मोजण्यासाठी किंवा कोणताही मीटर काढून टाकण्यासाठी, त्याची चाचणी घेण्यासाठी, त्याच्या तपासणीसाठी तो बदलण्यासाठी किंवा वाचण्यासाठी झोपडपट्टीतील चालू असलेल्या बांधकामाची तपासणी करण्याकरिता;

कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करता येईल.

(२) अशी तपासणी झाल्यानंतर, उपद्रवास प्रतिबंध करण्यासाठी किंवा तो दूर करण्यासाठी जमीन खोदणे आवश्यक असल्याचे आढळून आल्यास, यामुळे झालेला खर्च, जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकाकडून किंवा भोगवटादारांकडून देण्यात येईल, परंतु कोणताही उपद्रव अस्तित्वात असल्याचे आढळून आले नाही किंवा जमीन खोदली नसती तर असा उपद्रव उदभवला नसता असे आढळून आल्यास, अशा कोणत्याही तपासणीसाठी खोदलेल्या किंवा नुकसानी झालेल्या किंवा काढून टाकलेल्या जमिनीचा किंवा इमारतीच्या जलनि:स्सारण व्यवस्थेचा किंवा इतर बांधकामाचा कोणताही भाग सक्षम प्राधिकरणाकडून स्वखर्चाने भरून काढण्यात येईल, पुन:स्थापित करण्यात येईल किंवा, यथास्थिति, दुरुस्त करण्यात येईल.

**बांधकाम चालू असलेल्या जमिनीशी संलग्न असलेल्या जमिनीवर प्रवेश करण्याचे अधिकार.**

**२९.** (१) सक्षम प्राधिकरणाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, सहायक किंवा श्रमिक यांच्यासह किंवा त्यांच्याशिवाय, या अधिनियमान्वये किंवा तद्न्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही बांधकामापासून पन्नास यार्डामधील कोणत्याही जमिनीवर माती, खडी, दगड किंवा इतर सामग्री टाकण्यासाठी किंवा बांधकामाच्या ठिकाणी जाता यावे म्हणून किंवा हे काम करण्यासंबंधातील इतर कोणत्याही प्रयोजनासाठी प्रवेश करता येईल.

(२) अशा प्रकारे प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही जमिनीवर प्रवेश करण्यापूर्वी प्रवेशाचे प्रयोजन नमूद करील आणि भोगवटादार किंवा मालक यांना तसे करणे आवश्यक वाटल्यास अशा प्रयोजनार्थ आवश्यक असलेल्या जमिनीस कुंपण घालील.

(३) अशा प्रकारे प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती या कलमान्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करताना शक्यतो कमीतकमी नुकसान पोहोचवील आणि अशा कोणत्याही नुकसानाबद्दल मग ते कायमचे असो वा तात्पुरते असो, अशा जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास अथवा या दोघांस, सक्षम प्राधिकरणाकडून भरपाई देय असेल.

**इमारतीत शिरकाव करणे.**

**३०.** सक्षम प्राधिकारणाने या बाबतीत लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही जागेत प्रवेश करण्यासाठी,—

(अ) असा प्रवेश करण्यासाठी दरवाजा, द्वारे (गेट) उघडणे किंवा अन्य आडकाठी दूर करणे आवश्यक आहे असे त्यास वाटल्यास, आणि

(ब) मालक किंवा भोगवटादार अनुपस्थित असल्यास अथवा उपस्थित असूनही असा दरवाजा, द्वार उघण्यास किंवा आडकाठी दूर करण्यास त्याने नकार दिल्यास,

कोणत्याही प्रकारे प्रवेश करणे किंवा कोणताही दरवाजा, द्वार उघडणे किंवा उघडण्याची व्यवस्था करणे किंवा इतर आडकाठी दूर करणे किंवा दूर करण्याची व्यवस्था करणे, हे कायदेशीर असेल.

**दिवसा प्रवेश करणे.**

**३१.** या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्राधिकृत केलेला कोणताही प्रवेश वाजवी वेळांमध्ये आणि सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान असेल त्या व्यतिरिक्त, करता कामा नये.

**सामान्यतः भोगवटादाराची किंवा मालकाची संमती घेणे.**

**३२.** या अधिनियमात तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीवर भोगवटादाराच्या किंवा भोगवटादार नसेल तर जमिनीच्या मालकाच्या संमतीशिवाय प्रवेश करता कामा नये आणि असा कोणताही प्रवेश, चोवीस तासांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीची, त्याबद्दलच्या इराद्याची लेखी नोटीस भोगवटादारास किंवा, यथास्थिति, मालकास दिल्याखेरीज, करता कामा नये :

परंतु, तपासणी करावयाची जागा ही गुरांचा गोठा किंवा शौचकूप किंवा मुत्री अथवा चालू बांधकाम असेल तर अशी कोणतीही नोटीस आवश्यक असणार नाही.

**निष्कासित करण्याच्या अधिकाराचा वापर केवळ सक्षम प्राधिकरणाने करणे.**

**३३.** सक्षम प्राधिकरणाने काढलेल्या आदेशास किंवा दिलेल्या निदेशास अनुसरून इमारतीतील भोगवटादारांनी इमारत रिकामी केलेली नाही याबाबत इमारतीच्या मालकाच्या अभिवेदनावरून किंवा स्वतः सक्षम प्राधिकरणाकडे असलेल्या इतर माहितीवरून सक्षम प्राधिकरणाची खात्री होईल त्या बाबतीत, प्राधिकरण, आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा मुदतीत, भोगवटादारांना इमारतीतून निष्कासित करण्यासंबंधी निदेश देईल आणि अशा निष्कासनाच्या प्रयोजनार्थ, आवश्यक असेल अशा बलाचा वापर करील किंवा अशा बलाचा वापर करण्याची व्यवस्था करील:

परंतु, या कलमान्वये कोणताही आदेश देण्यापूर्वी सक्षम प्राधिकरण, इमारतीच्या भोगवटादारांना तीमधून का निष्कासित करण्यात येऊ नये याविषयी कारणे दाखविण्याची वाजवी संधी येईल.

**झोपडपट्टी क्षेत्रामधून उपद्रवकारक किंवा घातक व्यवसाय काढून टाकण्याचे अधिकार.**

**३४.** सक्षम प्राधिकरणाला लेखी आदेशाद्वारे झोपडपट्टीत कोणताही घातक किंवा उपद्रवकारक व्यवसाय करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत, तो व्यवसाय त्या क्षेत्रातून काढून टाकण्याबद्दल निर्देश देता येईल:

परंतु, असा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीस, असा आदेश का काढू नये याविषयीचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(शा.म.मु.) एच ४१०५—७ (७,०९७—७-२०१२)

अपिले. **३५.** (१) या अधिनियमामध्ये अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल ती खेरीज करून सक्षम प्राधिकरणाने दिलेली किंवा काढलेली कोणतीही नोटीस, आदेश किंवा निदेश यामुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला अशी नोटीस, आदेश किंवा निदेश देण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या मुदतीच्या आत, प्रशासनाकडे अपील करता येईल.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेले प्रत्येक अपील, जिच्याविरुद्ध अपील केले असेल ती नोटीस, आदेश किंवा निदेश यांच्या प्रतीसह, लेखी विनंतीअर्जाच्या स्वरूपात करण्यात येईल.

(३) अपिलाची स्वीकृती झाल्यानंतर, नोटीस, आदेश किंवा निदेश यांच्या अंमलबजावणीसंबंधीची सर्व कार्यवाही आणि त्याच्या कोणत्याही उल्लंघनासंबंधीचे सर्व खटले, अपिलाचा निर्णय होईतोपर्यंत आस्थगित करण्यात येतील; आणि अपिलात नोटीस, आदेश किंवा निदेश रद्द करण्यात आल्यास त्यांचा झालेला आज्ञाभंग हा अपराध म्हणून मानण्यात येणार नाही.

(४) अपिलदारांचे म्हणणे ऐकल्याखेरीज किंवा त्याला जातीने किंवा विधिव्यवसायीमार्फत आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, या कलमान्वये कोणत्याही अपिलावर निर्णय घेण्यात येणार नाही.

(५) प्रशासकाने अपिलावर दिलेला निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयात त्यावर हरकत घेतली जाणार नाही.

नोटीस बजावणे, इत्यादी. **३६.** (१) या अधिनियमान्वये दिलेली प्रत्येक नोटीस, आदेश किंवा निदेश या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याखेरीज,—

(अ) नोटीस, आदेश किंवा निदेश देऊन किंवा देऊ करून [1][किंवा] ती नोटीस किंवा तो आदेश किंवा निदेश ज्या व्यक्तीस देणे अभिप्रेत असेल त्या व्यक्तीस ती नोटीस, तो आदेश किंवा ते निदेश, डाक नोंदणीद्वारे पाठवून; किंवा

(ब) जर अशी व्यक्ती सापडत नसेल तर तिच्या निवासाच्या किंवा कामधंद्याच्या शेवटी माहीत असलेल्या ठिकाणाच्या ठळक जागी नोटीस, आदेश किंवा निदेश चिकटवून किंवा त्याच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीकडे किंवा प्रौढ नोकराकडे नोटीस, आदेश किंवा निदेश देऊन किंवा सादर करून अथवा ती नोटीस, तो आदेश किंवा निदेश जिच्यासंबंधी असेल त्या इमारतीच्या किंवा जागेच्या कोणत्याही ठळक जागी ती चिकटविण्याची व्यवस्था करून; नोटीस बजाविण्यात येईल.

(२) ज्या व्यक्तीवर नोटीस, आदेश किंवा निदेश बजावयाचा असेल ती व्यक्ती अल्पवयीन असेल त्याबाबत, तिच्या पालकांवर किंवा तिच्या कुटुंबातील कोणत्याही प्रौढ व्यक्तीवर किंवा प्रौढ नोकरावर बजाविलेली नोटीस, आदेश किंवा निदेश हा अल्पवयीन व्यक्तीवर बजाविण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(३) या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमान्वये जी सार्वजनिक नोटीस, आदेश किंवा निदेश म्हणून बजावावयाची असेल किंवा नोटिशीत, आदेशात किंवा निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीवर जी बजावणे आवश्यक नसेल अशी प्रत्येक नोटीस, आदेश किंवा निदेश, हा, अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याखेरीज, जर तिची किंवा त्याची एक प्रत सक्षम प्राधिकरणाच्या कार्यालयात अशा ठळक जागी किंवा सक्षम प्राधिकरण निदेश देईल अशा रीतीने अशा मुदतीस अशा इतर सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आली किंवा अशा स्थानिक वर्तमानपत्रात किंवा अशा इतर रीतीने प्रसिद्ध करण्यात आली तर, उक्त नोटीस, आदेश किंवा निदेश हा वाजवीरीत्या बजाविण्यात आल्याचे मानण्यात येईल.

शास्ती. **३७.** (१) या अधिनियमान्वये काढलेली किंवा दिलेली कोणतीही नोटीस, आदेश किंवा निदेश यांचे पालन करण्यात जो कोणी कसूर करील त्यास, दोषसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४ द्वारे " आणि " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) जो कोणी, कलम १२, पोट-कलम (१०) अन्वये लादलेल्या कोणत्याही निर्बंधाचे किंवा निर्मूलन क्षेत्राच्या पुनर्विकासासंबंधातील कोणत्याही योजनेचे उल्लंघन करून, कोणतेही बांधकाम सुरू करील किंवा सुरू करण्याची व्यवस्था करील त्याला दोषसिद्धीनंतर, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(३) जो कोणी, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीत किंवा तीवर प्रवेश करण्यास अडथळा निर्माण करील किंवा असा प्रवेश केल्यानंतर अशा व्यक्तीस उपद्रव देईल किंवा असा अडथळा करण्यास किंवा उपद्रव देण्यास प्रोत्साहन किंवा चिथावणी देईल किंवा अपप्रेरणा देईल त्यास, दोषसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(४) या अधिनियमाखालील अपराध करणारी व्यक्ती, कंपनी असेल तर, असा अपराध घडल्याच्या वेळी कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी ज्या व्यक्तीकडे कंपनीचा प्रभार असेल व अशा कारभाराबद्दल जी व्यक्ती कंपनीला जबाबदार असेल अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी ही, अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व त्यानुसार तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षेस ती पात्र ठरेल :

परंतु, असा कोणताही अपराध हा, आपल्या माहितीशिवाय झालेला आहे किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्व वाजवी दक्षता घेतली होती असे जर कोणतीही व्यक्ती सिद्ध करील तर या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, अशी कोणतीही व्यक्ती या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(५) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि असा अपराध हा कंपनीचा कोणताही संचालक किंवा व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्याने झाला आहे किंवा असा अपराध हा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे झाला आहे असे सिद्ध करण्यात येईल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हा सुद्धा उपरोक्त अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि शिक्षेस तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण :—** या कलमाच्या प्रयोजनांसाठी :—

(अ) " कंपनी " याचा अर्थ, निगम निकाय असा होतो आणि त्यामध्ये, भागीदारी संस्था किंवा व्यक्तींची इतर संघटना यांचा समावेश होतो ; आणि

(ब) भागीदारी संस्थेच्या संबंधात " संचालक " याचा अर्थ भागीदारी संस्थेतील भागीदार असा होतो.

**विवक्षित बाबतीत इमारती पाडून टाकण्याबाबत आदेश.**

**३८.** (१) कलम ८ च्या तरतुदींचे किंवा कलम १२ पोट-कलम (१०) अन्वये लादलेल्या कोणत्याही निर्बंधाचे किंवा शर्तीचे किंवा निर्मूलन क्षेत्राच्या पुनर्विकासासंबंधातील कोणत्याही योजनेचे उल्लंघन करून किंवा या अधिनियमान्वये काढलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही नोटिशीचे, आदेशाचे किंवा निदेशाचे उल्लंघन करून कोणत्याही इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले असेल किंवा बांधकाम करण्यात येत असेल किंवा बांधकाम पूर्ण करण्यात आले असेल तर सक्षम प्राधिकरणास, या अधिनियमान्वये किंवा इतर कोणत्याही कायद्यान्वये जी कोणतीही इतर उपाययोजना करता येईल त्याशिवाय, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दोन महिन्यांपेक्षा अधिक नसणाऱ्या मुदतीत, असे बांधकाम, त्याच्या

मालकाकडून पाडण्यात यावे असा निदेश देणारा आदेश काढता येईल आणि मालकाने अशा आदेशाचे पालन करण्यात कसूर केल्यास अशा रीतीने उभारण्यात आलेली इमारत, सक्षम प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे, जप्त केली जाण्यास किंवा तडकाफडकी पाडून टाकली जाण्यास पात्र ठरेल, आणि अशा रीतीने बांधकाम पाडून टाकण्याचा खर्च, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, मालकाकडून वसूलयोग्य असेल :

परंतु, असा कोणताही आदेश, मालकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, देण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये करण्यात आलेल्या जप्तीचा सक्षम प्राधिकरणाकडून न्यायनिर्णय करण्यात येईल आणि अशा रीतीने जप्त केलेल्या कोणत्याही मालमत्तेची विल्हेवाट सक्षम प्राधिकरण निदेश देईल त्याप्रमाणे लावण्यात येईल ; आणि या कलमान्वये मालमत्ता काढून नेण्यासंबंधीचा खर्च, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, वसुलीयोग्य असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही इमारत पाडून टाकण्याची व्यवस्था करण्याच्या प्रयोजनार्थ, सक्षम प्राधिकरणास आवश्यक असेल अशा बलाचा वापर करता येईल किंवा वापर करण्याची व्यवस्था करता येईल.

**न्यायालयांची अधिकारिता.**

**३९.** प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा इलाखा शहर दंडाधिकारी यांपेक्षा कनिष्ठ असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडून अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाची न्यायचौकशी करण्यात येणार नाही.

**खटला भरण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची पूर्वमंजुरी.**

**४०.** या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्धल कोणताही खटला सक्षम प्राधिकरणाच्या पूर्वमंजूरीखेरीज दाखल करण्यात येणार नाही.

[१][" परंतु, कलम ३ झ-२ अन्वये, शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासाठी खटला दाखल करण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्यांची अशी पूर्वमंजुरी आवश्यक असणार नाही ".]

**सद्‌भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.**

**४१.** या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये केलेल्या नियमान्वये सद्‌भावपूर्वक केली असेल किंवा करण्याचा इरादा असेल अशा गोष्टीबद्दल सक्षम प्राधिकरणाविरुद्ध किंवा त्याच्या प्राधिकरणान्वये कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**अधिकारितेस रोध.**

**४२.** या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल त्याखेरीज, ज्या कोणत्याही बाबीचा निर्णय करण्याचे अधिकार या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रशासकास, सक्षम प्राधिकरणास किंवा न्यायाधिकरणास प्रदान करण्यात आले असतील त्या बाबीसंबंधात कोणत्याही दिवाणी न्यायालयास अधिकारिता असणार नाही ; आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारानुसार केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयाने किंवा इतर प्राधिकाऱ्याने कोणताही मनाई आदेश मंजूर करता कामा नये.

**सक्षम प्राधिकारी इत्यादी लोकसेवक असणे.**

**४३.** सक्षम प्राधिकारी व या अधिनियमाखाली त्याने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ४ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

**४४.** या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये सक्षम प्राधिकरणाने (जे निगम निकाय असेल) केलेला कोणताही खर्च या अधिनियमाच्या कोणत्याही तरतूदी अन्वये जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करावयाचा असेल व अशा खर्चाच्या बाबतीत सक्षम प्राधिकरणाच्या हक्क मागणीबाबत वाद असेल त्या बाबतीत, तो प्रश्न न्यायाधिकरणाकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल व न्यायाधिकरण त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर व ज्या व्यक्तीकडून ती रक्कम देय असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आल्यानंतर त्या प्रश्नांचा निर्णय करील व न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयात किंवा इतर प्राधिकरणापुढे त्याबाबत हरकत घेण्यात येणार नाही. न्यायाधिकरण दाव्याचा निर्णय सक्षम प्राधिकरणाच्या बाजूने देईल त्याबाबतीत, जो खर्च देण्याबाबत निदेश देण्यात आले असतील असा खर्च, वीसपेक्षा अधिक नसतील इतक्या, समान मासिक हप्त्यांमध्ये, देता येईल. **सक्षम प्राधिकरणाच्या हक्कमागण्या जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यापूर्वी न्यायाधिकरणाने त्यांचा निर्णय करणे.**

[१][**४४-अ.** (१) अध्यक्षांच्या किंवा इतर सदस्यांच्या मृत्यूमुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्यांच्या नियुक्तीच्या समाप्तीमुळे किंवा त्यांच्या नियुक्तीच्या समापनामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे कोणतेही पद रिकामे होईल तर, असे रिकामे पद यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तींची नियुक्ती करून भरण्यात येईल. **न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांची रिक्त पदे व त्यांची तात्पुरती अनुपस्थिती.**

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही जागा रिकामी आहे याच केवळ कारणावरून न्यायाधिकरणाची रचना अवैधरीत्या झाली असल्याचे मानण्यात येणार नाही आणि न्यायाधिकरणापुढे कोणत्याही कामकाजाची सुनावणी चालू असताना, न्यायाधिकरणाचा एखादा सदस्य (अध्यक्ष नसणारा) उपस्थित नव्हता याच केवळ कारणावरून न्यायाधिकरणाच्या कोणात्याही निर्णयावर कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे हरकत घेण्यात येणार नाही.]

**४५.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारितेचा वापर करताना न्यायाधिकरणास, शपथेवर पुरावा, प्रतिज्ञापन किंवा प्रतिज्ञापत्र घेणे, किंवा साक्षीदारांना हजर राहाण्यासाठी समन्स पाठवणे व हजर राहाण्यास भाग पाडणे, लेख व महत्त्वाच्या वस्तू यांचा शोध घेऊन त्या सादर करण्यास भाग पाडणे, कोणतेही न्यायालय किंवा कार्यालय यातून कोणताही सरकारी अभिलेख किंवा त्यांची कोणतीही प्रत अधिगृहीत करणे, साक्षीदार किंवा लेख यांच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढणे या आणि विहित करण्यात येतील अशा इतर प्रयोजनांसाठी [२][स्थगन आदेश देण्याचे अधिकार आणि दिवाणी न्यायालयाचे इतर कोणतेही आदेश यांसह] न्यायाधिकरणाकडे निहित करण्यात येतील असे दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील ; आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* याच्या कलम १९५, ४८० व ४८२ यांच्या सर्व प्रयोजनांसाठी न्यायाधिकरण हे दिवाणी न्यायालय म्हणून समजण्यात येईल आणि त्यांचे कामकाज हे भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही असेल. **न्यायाधिकरणा-संबंधातील तरतुदी.**

१८९८ चा ५.
१८६० चा ४५.

१९६३ चा ३६.
[३][ (१-अ) या अधिनियमान्वये न्यायाधिकरणाकडे दाखल करावयाच्या प्रत्येक अपिलास किंवा करावयाच्या अर्जास मुदत अधिनियम, १९६३ याची कलमे ४, ५, १२ व १४ यांच्या तरतुदी लागू असतील.]

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ५ द्वारे कलम ४४अ समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६(१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६(२) द्वारे पोट-कलम (१-अ) समाविष्ट करण्यात येईल व ते नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

*आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा दोन) पहा.

(२) सादर करावयाच्या कोणत्याही प्रतिज्ञापत्राच्या संबंधात, याबाबतीत [१][न्यायाधिकरणाने किंवा अध्यक्षाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास] अभिसाक्षीस शपथ देता येईल.

[२][ (३) न्यायाधिकरणास मदत करण्यासाठी, राज्य शासन, ते, वेळोवेळी ठरवील त्याप्रमाणे अधिकारी व इतर कर्मचारीवर्ग न्यायाधिकरणाच्या वेळोवेळी स्वाधीन करील. अधिकारी व इतर कर्मचारीवर्ग यांचे पारिश्रमिक व सेवेच्या इतर शर्ती, राज्य शासनाकडून वेळोवेळी ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(३-अ) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी व सेवेच्या इतर शर्ती, या, कलम ४६ अन्वये केलेल्या नियमांद्वारे विनियमित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील].

(४) या अधिनियमाच्या तरतुदींस व राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेस अधीन, अध्यक्षास न्यायाधिकरणाच्या कामकाजाचे व कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी विनियम करता येतील. त्यामध्ये न्यायाधिकरणाने खर्च देणे, कोणतीही आदेशिका फी, [३][फाईलिंग फी किंवा प्रती काढण्यासंबंधीची किंवा अनुवादासंबंधीची फी ] (प्रती न्यायालय शुल्क मुद्रांकाच्या स्वरूपात वसूल करण्याबाबतच्या तरतुदी धरून) आकारणे, न्यायाधिकरणापुढे हजर होण्याचा हक्क, न्यायाधिकरणाच्या बैठकीची/च्या जागा, न्यायाधिकरणापुढील कामकाज चालू असताना त्याचे सदस्य म्हणून बसणाऱ्या व्यक्तीमध्ये बदल झाला असला तरीही उक्त कामकाजाची न्यायाधिकरणाने विल्हेवाट लावणे व या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा परिणामकारकरीत्या वापर करण्यासाठी व आपली कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर गोष्टींचा समावेश होईल.

(५) या कलमान्वये केलेले विनियम **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

(६) न्यायाधिकरणाने दिलेले सर्व आदेश, जर ते राज्य शासनाने दिले असते तर ज्या रीतीने अंमलात आणले गेले असते त्याच रीतीने अंमलात आणले जातील.

(७) मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी न्यायाधिकरणाकडे करण्यात आलेल्या प्रत्येक अपिलावर किंवा अर्जावर, जर मालमत्तेचे मूल्य दहा हजार रुपये किंवा त्याहून कमी असेल तर एक रुपयाचा व जर असे मूल्य दहा हजार रुपयांहून अधिक असेल तर दोन रुपयांचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावण्यात येईल. (१९५९ चा मुंबई ३६.)

**नियम करण्याचे अधिकार.** **४६.** (१) राज्य शासनास, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूनेद्वारे, या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

[४]["परंतु, या अधिनियमाच्या प्रकरण एक-अ च्या प्रयोजनांसाठी जेव्हा प्रथमच नियम केले जात असतील तेव्हा ते, पूर्वप्रसिद्धीशिवाय करता येतील."]

(२) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशानांत मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरता, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल व ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम ६(३) द्वारे "न्यायाधिकरणाने नेमलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६(४) अन्वये पोट-कलम (३) ऐवजी पोट-कलम (३) आणि (३-अ) दाखल करण्यात आले.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ६(५) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच परिणामक्षम राहील किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक्षम राहणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.

**अनुरूप कायदे व त्या अन्वये तात्पुरते प्रदान करण्यात आलेले अधिकार अंमलात असणे बंद होणे.**

[१][**४७.** (१) कोणतेही क्षेत्र या अधिनियमान्वये झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येईल त्याबाबतीत, असे घोषित करण्यात आल्याच्या तारखेपासून, उक्त तारखेच्या लागतपूर्वी त्या झोपडपट्टीच्या संबंधात त्याच्या सुधारणेसाठी त्यावेळी अंमलात असतील अशा या अधिनियमाच्या तरतुदीनुरूप असलेल्या कोणत्याही नगरपालिकाविषयक अथवा इतर कायद्यांच्या तरतुदी या, या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, उक्त घोषणा जोपर्यंत अंमलात असेल तोपर्यंत झोपडपट्टी क्षेत्रात अंमलात असण्याचे बंद होईल.

(२) या अधिनियमान्वये कोणतेही क्षेत्र झोपडपट्टी म्हणून जाहीर करण्यात आले असेल, आणि कोणतेही बांधकाम अथवा कोणतीही बांधकामे पाडून टाकण्याचा आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत, अशा आदेशाच्या तारखेपासून उक्त तारखेच्या लगतपूर्वी, झोपडपट्टीचे निर्मूलन व पुनर्विकास करण्यासाठी आणि बांधकामे पाडून टाकण्यासाठी या अधिनियमात असलेल्या तरतुदींशी अनुरूप असतील अशा, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही नगरपालिकांविषयक अथवा इतर कायद्यांच्या तरतुदी या, या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त यथास्थिति असे बांधकाम अथवा बांधकामे यांचा पुनर्विकास होईपर्यंत, त्यांच्यासंबंधात लागू होणार नाहीत.

(३) कोणतेही क्षेत्र झोपडपट्टी क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले असले तरीही, कोणतेही बांधकाम किंवा बांधकामे पाडून टाकण्याबाबत या अधिनियमान्वये जोपर्यंत आदेश देण्यात येणार नाहीत तोपर्यंत गलिच्छ वस्ती निर्मूलनासाठी आणि तिच्या पुनर्विकासासाठी व त्या गलिच्छ वस्तीतील कोणतीही बांधकामे पाडून टाकण्यासाठी कोणत्याही नगरपालिकाविषयक किंवा इतर कायद्यांच्या त्यावेळी अंमलात असलेल्या तरतुदींना या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे बाध येणार नाही :

परंतु, कोणतेही क्षेत्र झोपडपट्टी क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आल्यानंतर, या अधिनियमान्वये कोणतेही बांधकाम किंवा कोणतीही बांधकामे पाडून टाकण्याचा आदेश देण्यात आल्याच्या तारखेपर्यंत, पालिका आयुक्त अथवा मुख्य अधिकारी, अथवा कोणताही इतर अधिकारी किंवा प्राधिकरण यांना अशा कोणत्याही कायद्यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य शासनाच्या नियंत्रणाधीन अशा कोणत्याही कायद्यान्वये प्रदान करण्यात आलेली बांधकामे पाडून टाकण्याच्या अधिकारांचा वापर करता येईल. या प्रयोजनासाठी, राज्य शासनास, अशा कोणत्याही अधिकाऱ्यांना अथवा प्राधिकरणांना कोणतेही सर्वसाधारण अथवा विशेष निदेश देता येतील व ते अशा निदेशांचे पालन करतील.]

**४८.** [विवक्षित अधिनियमितींची सुधारणा] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ५ द्वारे हे कलम वगळण्यात आले.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम २ द्वारे मूळ कलमाऐवजी कलम ४७ दाखल करण्यात आले.

## पहिली अनुसूची

(कलम १७ पहा)

### निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न निर्धारित करण्याची तत्त्वे

१. संपादन केलेल्या जमिनीवरील कोणतीही इमारत धरून अशा जमिनीच्या मालकाला कलम १७ पोट-कलम (४) मध्ये उल्लेखिलेल्या लागोपाठच्या पाच वर्षांच्या कालावधीत प्रत्यक्ष मिळालेले एकूण भाडे सक्षम प्रधिकरणाने प्रथम ठरविले पाहिजे.

२. ते ठरविण्यासाठी, सक्षम प्राधिकरणाला कोणतीही स्थानिक चौकशी करता येईल आणि आवश्यक तर, संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या मालमत्ता कर आकारणी पुस्तकामधून अशा जमिनीचे भाडेमूल्य दर्शविणाऱ्या उताऱ्यांच्या प्रमाणित प्रती मिळविता येतील.

३. कलम १७, पोट-कलम (४) मध्ये उल्लेखिलेले निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न हे सरासरी मासिक स्थूल भाड्याच्या साठ टक्क्यांइतके असेल व सरासरी मासिक स्थूल भाडे परिच्छेद १ अन्वये सक्षम प्राधिकरणाने ठरविल्याप्रमाणे लागोपाठच्या पाच वर्षांमधील एकूण भाड्याच्या एक साठांश इतके असेल.

४. वर उल्लेखिलेल्या स्थूल मासिक भाड्याच्या चाळीस टक्के इतकी रक्कम निव्वळ सरासरी मासिक उत्पन्न ठरवताना विचारात घेण्यात येणार नाही, पण ती स्थानिक प्राधिकरणास कोणताही मालमत्ता कर देण्यासाठी, आकार गोळा करण्यासाठी, प्राप्तीकर किंवा बुडित कर्जे यासाठी व त्याचप्रमाणे त्या जमिनीवर कोणत्याही इमारती असल्यास, त्यांच्या दुरुस्त्यांची व परिरक्षणाची कामे यासाठी जमिनीच्या मालकाकडून सर्वसाधारणपणे जो खर्च करण्यात येतो त्या खर्चादाखल वजा करण्यात येईल.

५. जमीन किंवा तिचा कोणताही भाग याचा भोगवटा करण्यात येत नसेल किंवा मालकाला पाच वर्षांच्या उक्त संपूर्ण मुदतीत किंवा तिच्या कोणत्याही भागात जमिनीच्या भोगवट्याबद्दल कोणतेही भाडे मिळालेले नसेल त्या बाबतीत, एकूण भाडे हे उक्त मुदतीत ती जमीन भाडेपट्ट्याने देण्यात आली असती तर मालकाला प्रत्यक्ष जे उत्पन्न मिळाले असते ते उत्पन्न असल्याचे मानण्यात येईल व या प्रयोजनार्थ, ती जमीन ज्या मुदतीत रिकामी राहिली असेल त्या मुदतीपूर्वीच्या किंवा नंतरच्या मुदतीत त्या जमिनीपासून किंवा जवळपासच्या तशाच जमिनीपासून प्रत्यक्ष मिळालेले भाडे विचारात घेण्यात येईल.

## दुसरी अनुसूची

[सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २ याच्या कलम ६ द्वारे वगळण्यात आली]

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई